## पुण्यात होर्डिंग कोसळून बँड पथकातील दोघे जखमी

**पुणे :** मुसळधार पावसामुळे जाहिरात फलक (होर्डिंग) बँड पथकाच्या वाहनावर कोसळल्याची



घटना पुणे-सोलापूर रस्त्यावरील लोणी काळभोर परिसरात शनिवारी (दि. १८) सायंकाळी घडली. होर्डिंग पडल्याने बँड पथकातील दोन जण तसेच घोडा जखमी झाला. मुंबईतील घाटकोपर परिसरात होर्डिंग कोसळून १६ जणांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेनंतर राज्यात बेकायदा होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशातच सोसाट्याच्या वाऱ्यामुळे लोणी काळभोर परिसरात जाहिरात फलक बँड पथकाच्या वाहनावर कोसळला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुर्घटनेत दोन जण जखमी झाले आहेत, तर एका घोड्यालाही मार लागला आहे. शिवाय गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३०१
www.ramprahar.com

रविवार, १९ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


पाकिस्तानचे गोडवे गाणाऱ्यांना भारतात थारा नाही -योगी/२

खारघरमधील वाहतूक कोंडीची समस्या मार्गी/३

अवकाळी पावसामुळे विविध घटकांना फटका/५


# राज्यातील प्रचाराची सांगता

## पाचव्या टप्प्यात देशभरात एकूण ४९ जागांवर उद्या मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी आठ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील ४९ जागांवर येत्या सोमवारी म्हणजेच २० मे रोजी पाचव्या टप्प्यात मतदान होईल. या टप्प्यात महाराष्ट्रातील १३ मतदारसंघांचा समावेश आहे. राज्यातील हे अखेरच्या टप्प्यातील मतदान असेल. यासाठीचा जाहीर प्रचार शनिवारी (दि. १८) सायंकाळी थांबला.



पाचव्या टप्प्यात उत्तर प्रदेशमध्ये १४, महाराष्ट्रात १३, पश्चिम बंगाल सात, बिहार व ओडिशा प्रत्येकी पाच, झारखंड तीन आणि जम्मू-काश्मीर व लडाख या केंद्रशासित प्रदेशात प्रत्येकी एका मतदारसंघात मतदान होईल. या टप्प्यात केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, पीयूष गोयल, स्मृती इराणी, काँग्रेसचे नेते राहुल गांधी, लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पासवान, माजी मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांच्यासह ६९५ उमेदवार रिंगणात आहेत.

निवडणूक कार्यक्रमातील एकूण सात टप्प्यांतील मतदानात सर्वांत कमी मतदारसंघ हे याच टप्प्यात निवडणुकीला सामोरे जात आहेत. या टप्प्यात महाराष्ट्रात मुंबईतील सहा (मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण), ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे अशा मिळून १३ मतदारसंघात मतदान होणार आहे.

जाहीर प्रचारासाठी शनिवारी संध्याकाळपर्यंत मुदत असल्याने राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी रॅली, सभांद्वारे प्रचार केला. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाराष्ट्राचा दौरा करून महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेतल्या आणि विकसित भारतासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्याचे आवाहन केले.





**कामोठे : पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मा. श्री. परेश ठाकूर केसरी पनवेल २०२४' भव्य कुस्त्यांचे जंगी सामने शनिवारी रंगले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे सचिव हिंदकेसरी पैलवान योगेश दोडके आदी मान्यवर उपस्थित होते. येथे उत्तरोत्तर एकाहून एक सरस कुस्त्या झाल्या. (वृत्त उद्याच्या अंकात)**

## मुलुंड राडाप्रकरणी ठाकरे गटाच्या पाच जणांना अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीदरम्यान मुंबईतील मुलुंडमध्ये ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी ईशान्य मुंबईतील भाजप महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा यांच्या कार्यालयाची तोडफोड केली. या प्रकरणी पोलिसांत गुन्हा नोंद झाला असून ठाकरे गटाच्या पाच कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आहे.

ईशान्य मुंबईतील निवडणूक ठाकरे गटाने प्रतिष्ठेची केली आहे. मुलुंडमध्ये शुक्रवारी ठाकरे गटाने भाजपचे उमेदवार मिहिर कोटेचा यांच्या वॉररूममध्ये पैसे वाटले जात असल्याचा आरोप केला व कोटेचांच्या कार्यालयाबाहेर मोठ्या संख्येने जमा होत घोषणाबाजी व कार्यालयाची तोडफोड केली.

सरकारी कामात अडथळा आणणे व दंगल माजवल्याप्रकरणी निवडणूक आयोगाने ठाकरे गटाच्या पाच कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल केला. या आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

## वाढदिवसानिमित्त माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हसतमुख स्वभाव, सर्वांना बरोबर घेऊन काम करणारे व्यक्तिमत्त्व, राजकारणापेक्षा समाजसेवेला महत्त्व देणारे तसेच सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक आदी क्षेत्रात कार्यरत राहून समाजात नावलौकिक प्राप्त करणारे पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे शनिवारी (दि. १८) वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते हितचिंतकांनी अभीष्टचिंतन केले.

(अधिक छायाचित्रे पान ६ व ८ वर..)



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कर्तव्यदक्ष कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचा राजकीय व सामाजिक कर्तृत्वाचा वसा अंगी बाळगत विविध क्षेत्रांत यशाची अनेक शिखरे परेश ठाकूर यांनी पादाक्रांत केली आहेत. तारुण्यातील सळसळता उत्साह समाजाच्या सेवेत खर्ची घालत त्यांनी आपल्या कार्याची चुणूक दाखवून दिली असून युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता रूजविण्यासाठी त्यांनी तरुणांची मजबूत फळी तयार केली आहे. युवकांचे आदर्श म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

युवा कार्यकर्ता ते पनवेल महापालिकेचे सभागृह नेते म्हणून परेश ठाकूर यांनी जबाबदारीने काम करीत असताना जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अशा विविध संस्था-संघटना माध्यमातून राबविल्या जाणारे सामाजिक उपक्रम, मेळावे, पक्षबांधणी त्याचबरोबर विविध कार्यक्रमात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. **(पान २ वर..)**

### निवडक

#### केजरीवाल यांचे पीए बिभव कुमार अटकेत

**नवी दिल्ली :** आपचे नेते व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे स्वीय सहाय्यक (पीए) बिभव कुमार यांच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी त्यांना शनिवारी (दि. १८) अटक करण्यात आली. स्वाती मालिवाल यांच्या जबाबानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. १३ मे रोजी मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या निवासस्थानी पीए बिभव कुमार मारहाण केल्याचा मालिवाल यांचा आरोप आहे.

#### विठ्ठल रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन २ जूनपासून होणार सुरू



**पंढरपूर :** येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पूर्णत्वास येत आहेत. त्यामुळे विठ्ठल आणि रूक्मिणीचे पदस्पर्श दर्शन २ जूनपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. सध्या रोज पहाटे ५ ते सकाळी ११ वाजेपर्यंत देवाचे लांबून दर्शन सुरू आहे.

## उद्धव ठाकरेंनी आनंद दिघेंनाही मानसिक त्रास दिला -मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

आनंद दिघे हे राज ठाकरेंची बाजू घ्यायचे. त्यामुळे उद्धव ठाकरेंना पोटदुखी व्हायची. उद्धव ठाकरेंनी दिघेंनाही मानसिक त्रास दिला, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत केला. मुंबईतील प्रचारसभेदरम्यान मुख्यमंत्री शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला.

मुलाखतीत एकनाथ शिंदे यांना विचारले गेले की, राज ठाकरे यांनी सभेत आनंद दिघे यांच्या आठवणींना उजाळा दिला. तुम्ही फार पूर्वीपासून त्यांच्यासोबत राहिलात, मग दिघे आणि राज ठाकरेंचे संबंध कसे होते? त्यावर मुख्यमंत्री म्हणाली की, 'खूप चांगले संबंध होते. या चांगल्या संबंधांमुळे दिघेसाहेब अनेक वेळा अडचणीत आले. राज ठाकरे काम करणारा माणूस. कधी कधी दिघेसाहेब राज ठाकरेंबद्दल चांगले बोलायचे, त्यांची बाजू लावून धरायचे, पण हे जे लोक त्यांना ते आवडायचे नाही. मग ती पोटदुखी व्हायची. त्यांनी दिघेसाहेबांनाही मानसिक त्रास दिला.

दिघेसाहेबांची एवढी लोकप्रियता होती. सभा, भाषण न देता एवढी लोकप्रियता मिळवणे सोपे काम नव्हते. याबद्दल त्यांना मत्सर होता. नेतृत्वावर विश्वास स्वतःचा नसला की या सगळ्या गोष्टी घडतात. त्यांनी दिघेसाहेबांना खूप मानसिक ताप दिला. बऱ्याच काही गोष्टी केल्यात, असे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बाळासाहेब आणि दिघेसाहेब यांचे संबंध खूप प्रेमळ आणि गुरू-शिष्याचे होते. हे जे बाकी लोक जे आहेत, त्यांना दिघेसाहेबांची लोकप्रियता सलत होती. त्यांनी दिघेसाहेबांना एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात घालविण्याचा प्रयत्न केला.

## संजय राऊत यांच्याविरुद्ध गुन्हा

**अहमदनगर : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीदरम्यान औरंगजेबाच्या जन्मस्थळाचा दाखल देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भाषणात एकेरी उल्लेख केल्याप्रकरणी ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांच्यावर कारवाई सुरू झाली आहे. या प्रकरणी अहमदनगरच्या कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहमदनगरमध्ये ८ मे रोजी झालेल्या सभेत संजय राऊत यांनी औरंगजेब आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म एकाच गावात झाला, असा दावा केला होता. एका औरंगजेबाला महाराष्ट्रामध्ये आम्ही गाडलं, तर तू कोण? अशा पद्धतीने संजय राऊत यांनी पंतप्रधानांचा एकेरी उल्लेख केला होता. समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याने राऊतांवर गुन्हा दाखल झाला आहे.

## जंजिरा किल्ल्यासह वॉटर स्पोर्ट्स २६ मेपासून राहणार बंद

**मुरूड : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुरूडजवळील राजपुरी बंदरात असणारा सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला व परिसरातील किनाऱ्यांवरील सर्व वॉटर स्पोर्ट्स २६ मेपासून बंद ठेवण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे राजपुरी येथून जंजिरा किल्ल्यावर जाण्या-येण्यासाठी बोट वाहतूकसुद्धा बंद असणार आहे.





याबाबत अधिक माहिती देताना पुरातत्व खात्याचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी सांगितले की, पावसाळा जवळ येत असल्याने अशा वेळी समुद्र रौद्र रूप धारण करून किनारी भागात मोठ मोठ्या लाटा उसळू लागतात. त्यामुळे पर्यटकांना कोणताही धोका पोहचू नये यासाठी दरवर्षी सुरक्षेच्या कारणास्तव जंजिरा किल्ला साधारणतः दोन महिने बंद ठेवण्यात येत असतो. त्यानुसार २६ मेपासून जंजिरा किल्ल्याचे दरवाजे बंद करावेत अशा स्वरूपाचे आदेश आम्हाला तसेच मेरिटाईम बोर्डाला प्राप्त झाले आहेत. त्याप्रमाणे निर्णय घेतला गेला आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळ मुंबईचे मुख्य बंदर अधिकारी कॅप्टन प्रवीण खरा यांनीसुद्धा एक पत्रक काढून समुद्रात चालणारी कोणतीही जलवाहतूक व पर्यटकांना लुभावण्यासाठी चालणारे वॉटर स्पोर्ट्स २६ मे ते ३१ ऑगस्टपर्यंत बंद करण्याचे आदेश निर्गमित केले गेले आहेत. पर्यटकांना पुढचा आठवडाच जंजिरा किल्ला तसेच जलवाहतुकीसाठी बोटी उपलब्ध असणार आहेत. त्यानंतर सर्व वाहतूक बंद राहणार असल्याने जंजिरा किल्लासुद्धा बंद राहिल, असे स्पष्ट केले आहे.

## कोकणात ६ जूनला मान्सूनचे आगमन

### केरळसह राज्यात वेळेवर दाखल होण्याचा अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) नैऋत्य मान्सून आगमनचा अंदाज वर्तवला आहे. अनुकूल हवामान परिस्थिती असल्याने ६ जून रोजी कोकणात मान्सूनचे आगमन होणार असून त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. नैऋत्य मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागरातील काही भाग आणि निकोबारांच्या बेटांवर पुढील ४८ तासांत दाखल होण्यासाठी अनुकूल वातावरण आहे. त्यामुळे केरळ आणि राज्यातदेखील मान्सून वेळेवर दाखल होण्याचा अंदाज आहे.



आयएमडीने यापूर्वी १९ मेपर्यंत मान्सून दक्षिण अंदमान समुद्रात दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली होती. यानंतर ३१ मेपर्यंत मान्सून देशाचे प्रवेशद्वार असलेल्या केरळमध्ये पोहचेल, अशी माहिती दिली आहे. यामुळे राज्याच्या इतर भागात मान्सूनच्या आगमनाबाबत उत्सुकता असल्याचे आयएमडी अधिकाऱ्यांनी सांगितले.

आयएमडी अंदमान आणि केरळ प्रदेशात मान्सूनच्या आगमनाचा अंदाज देत असताना इतर राज्यांसाठी तारखांचा अंदाज देत नाही. डेटाच्या आधारे मान्सूनच्या उत्तरेकडील प्रगतीचे मॅप केले जाते. त्यानुसार मान्सून ५ जून रोजी गोव्यात दाखल होऊन ६ जूनपर्यंत कोकणात पोहचण्याची शक्यता आहे, तर ७ जूनपर्यंत पुण्यात येण्याचा अंदाज आहे.

उल्लेखनीय म्हणजे या वर्षीच्या मान्सूनच्या प्रारंभादरम्यान बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ तयार झाले नाही. त्यामुळे मान्सून कोणत्याही व्यत्ययाविना प्रवास करू शकतो.

## माथेरान मिनीट्रेनला मिळणार गतवैभव

### ऐतिहासिक वाफेवर चालणाऱ्या इंजिनचा देणार लूक

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे माथेरान हे पर्यटकांचे सुट्टीमधले सर्वांत आवडते ठिकाण आहे. नेरळ ते माथेरानपर्यंतच्या उंच पर्वतरांगा मिनीट्रेनमधून पाहणे एक अवर्णनीय अनुभव असतो. अशातच सध्याच्या डिझेलवर चालणाऱ्या इंजिनला ऐतिहासिक वाफेवर चालणाऱ्या इंजिनचा लूक देऊन या नॅरोगेज मार्गाच्या गौरवशाली भूतकाळाचे पुनरूज्जीवन करण्यासाठी मध्य रेल्वे सज्ज झाली आहे.

भारतातील काही ऐतिहासिक पर्वतीय रेल्वेपैकी एक असलेल्या नेरळ-माथेरान लाइट रेल्वेने १९०७मध्ये स्टीम इंजिनद्वारे चालवलेल्या पहिल्या टॉयट्रेनसेवेसह ११६ गौरवशाली वर्षे पूर्ण केली आहेत. मध्य रेल्वेच्या परळ कार्यशाळेतील अभियंते व तंत्रज्ञांची एक विशेष टीम आता स्टीम इंजिन हूडचे मॉडेल तयार करण्यासाठी व आवश्यक बदल करण्यासाठी काम



करीत आहे, जेणेकरून हे इंजिन सुरळीत चालावे आणि त्याचे ऐतिहासिक सौंदर्यदेखील राखता येईल.

हेरिटेज लूक देण्याच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये अनेक तांत्रिक प्रक्रियांचा समावेश आहे. यामध्ये सध्याच्या इंजिनचे हुड काढून टाकणे, नवीन ऐतिहासिक वाफेवर चालणाऱ्या इंजिनचे उत्पादन, फिटिंग, सध्याच्या डिझेल इंजिनमध्ये बदल करणे, वाफेचे फिटिंग, ध्वनी उत्पादन प्रणाली आणि शेवटी हुडसह इंजिनचे पेंटिंग आणि आवश्यकतेनुसार स्टिकर्ससह सजावट करणे हे आहे.

नेरळ-माथेरान राईड आता ऐतिहासिक ट्रेनमध्ये प्रवास करण्याचा, निसर्ग जवळून पाहण्याचा आणि माथेरानच्या नैसर्गिक वातावरणातील शांततेत रममाण होण्याचा विलोभनीय अनुभव देईल, असा विश्वास मध्य रेल्वे प्रशासनाने व्यक्त केला आहे.

#### पर्यटनाला चालना आणि रोजगाराच्या संधी

नेरळ-माथेरान रेल्वेचे बांधकाम १९०४मध्ये सुरू झाले आणि दोन फूट गेज लाईन अखेरीस १९०७मध्ये वाहतुकीसाठी खुली करण्यात आली. खबरदारीचा उपाय म्हणून पावसाळ्यात हा मार्ग बंद असतो. तथापि, अमन लॉज ते माथेरानदरम्यानची शटलसेवा पावसाळ्यातही सुरू असते. मध्य रेल्वेने प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी या विभागात अनेक पायाभूत सुविधांची कामे हाती घेतली आहेत. नवा उपक्रम केवळ पर्यटकांसाठी एकंदर अनुभवच वाढवणार नाही, तर पर्यटनाला चालना आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन स्थानिक अर्थव्यवस्थेतही महत्त्वपूर्ण योगदान देईल.

## निवडक

### चर्मकार समाजाचा महायुतीला पाठिंबा

**नवी मुंबई :** सानपाडा येथील शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या निवासस्थानी चर्मकार समाजाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित राहून त्यांनी श्री संत रोहिदास सामाजिक संस्था नवी मुंबई या संस्थेच्या वतीने महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांना पाठिंबा जाहीर केला. संस्थेचे संस्थापक अथवा अध्यक्ष भानुदास राजगुरू, उपाध्यक्ष सुरेश खाडे, संघटक सुभाष घोडके, सचिव राजाराम खाडे, उपसचिव महादेव गायकवाड, खजिनदार विना शिंदे आणि चर्मकार समाजाचे अनेक बांधव उपस्थित होते.

### राजश्री येवले यांची निवड

**नवी मुंबई :** सानपाडा येथील सामाजिक कार्यकर्त्या राजश्री येवले यांची मागासवर्गीय बेकारी निवारण संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या माध्यमातून नवी मुंबईसह राज्यात इतरत्रदेखील येवले यांना सामाजिक कार्य करता येणार आहे. येवले या सानपा घरकाम करणाऱ्या महिलांची संघटना चालवतात. त्यांच्या या कार्याचा अनुभव लक्षात घेत त्यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### बेवारस वाहनांच्या मालकांचा शोध

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेवारस व अपघातग्रस्त ११ वाहनांच्या मालकांचा शोध घेण्याची मोहिम सुरू केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने दुचाकी एमएच-०३-एपी-१०५८ बजाज प्लॅटीना, एमएच-४८-एम-४३२५ बजाज पल्सर, एमएच-०६-बीएफ-६६९७ मॅस्ट्रो स्कुटी, एमएच-०५-झेड-७३३२ रिक्षा, नंबर नसलेली डोमीनार गाडी, नंबर नसलेली होंडा शाईन दुचाकी, एमएच-४३-एव्ही-७३६४ पॅशन प्रो मोटार सायकल, एमएच-०३-सीझेड-३६८० अॅक्टीव्हा स्कुटी, एमएच-०३-बीएफ-०१५३ पल्सर, एमएच-०६-यु-२०८५ पॅशन प्रो व एमएच-२९-व्हीएच-४०५० यामहा एफझेड या गाडीच्या मालकांनी तळोजा पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४१२३३३ मो. नं.९८९७७९७१७२, पोलीस निरीक्षक गुन्हे रमेश जाधव मो. नं.९८२१५५९२६६, पो.हवा.निवळे मो.नं.९०८२१२५१४१ यांच्याशी व्यक्तीशः अथवा मोबाईलवर संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि अविनाश काळदाते यांनी केले आहे.

# पाकिस्तानचे गोडवे गाणाऱ्यांना भारतात थारा नाही -मुख्यमंत्री योगी

**मालेगाव : प्रतिनिधी**




देशाला आत्मनिर्भर, विकसित, प्रगतीशील व विकास पथावर नेत अग्रणी राष्ट्र बनविण्यासाठी एनडीए आघाडीला मतदान करा. याउलट विरोधी इंडिया आघाडीला हा देश लुटायचा आहे. धर्माच्या आधारावर आरक्षण देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करतांनाच आरक्षण देण्याचा कॉंग्रेसचा हा डाव देशाच्या विभाजनाची आधारशिला आहे.

देशात राहून पाकिस्तानचे गोडवे गाणाऱ्यांना येथे थारा नाही अशी टीका उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शनिवारी (दि. १८) मालेगाव येथे जाहीर सभेत केली. योगी आदित्यनाथ म्हणाले की, मुघलांचा आतंक सुरू असतांना छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची पताका फडकावली. याच औरंगजेबची आत्मा कॉंग्रेसमध्ये घुसली. त्यातुनच कॉंग्रेस अध्यक्ष राम मंदिरावर घाला घालण्याची भाषा करीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाचशे वर्षांचे स्वप्न साकार केले. राम मंदिराची निर्मिती केली. जगात भारताचा सन्मान वाढवला. सिमापारच्या आतंकवादी कारवाया बंद झाल्या. देशातील ८० कोटी जनतेला मोफत धान्य मिळत असतांना पाकिस्तान सर्वत्र भीक मागत आहे. तेथील जनता अन्नासाठी त्रस्त आहे.

आपल्या देशात व्यापारी व महिला सुरक्षित झाल्या. प्रत्येक हिंदू सणापूर्वी दंगली होत होत्या त्यांना आळा बसला. सुरक्षेच्या बाबतीत प्रत्येकजण निर्भर झाला. देशाची दहा वर्षात लक्षणीय प्रगती केली. रस्ते, पूल, विमानतळ अशा शेकडो पायाभूत सुविधांचे जाळे रचले. जेवढी पाकीस्तानची लोकसंख्या आहे तेवढे देशातील नागरीक दारिद्र्य रेषेच्या वर आले.

चार कोटी गरीबांना घरे मिळाली. ५० कोटी जनधनची खाती उघडली. बारा कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात किसान सन्मान निधी, आयुष्यमान भारत योजनेत पाच लाखांचा मोफत उपचार, शेतकरी आत्महत्या थांबल्या. गरीब व शेतकरी कल्याणाच्या योजना राबविण्यात आल्या. आयआयटी, एम्स साकारले. घरोघरी नळ व पाणी आले.

आम्हाला सत्ता सेवेसाठी व देशाच्या सन्मानासाठी हवी आहे. हा नया भारत आहे. हा करून दाखवतो. आम्ही कोणाला छेडत नाही मात्र कोणी छेडले तर त्याला सोडत नाही. यासाठी ज्यांनी रामाला आणले त्यांना आपण सत्तेवर आणा. डॉ. सुभाष भामरे यांना विजयी करा, असे आवाहन करतांनाच त्यांनी मी तुम्हाला मतदानाचे आवाहन करण्याबरोबरच अयोध्याला दर्शनासाठी या हे सांगण्यासाठी आल्याचे सांगितले. या वेळी नागरिक उपस्थित होते.

## पनवेलमध्ये बोगस डॉक्टरांविरोधात शोधमोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेने आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. पालिका हद्दीतील खासगी डॉक्टरांची माहिती आपल्याकडे उपलब्ध असावी यादृष्टीने पालिकेने केलेल्या आवाहनाला डॉक्टरांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने पालिकेकडून लवकरच विशेष मोहीम राबविली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यात येणार आहे.

खासगी डॉक्टरांची पालिकेकडे नोंदणी असल्यास पालिका क्षेत्रातील डॉक्टरांची आकडेवारी पालिकेकडे उपलब्ध होईल. याबाबत पालिकेच्या आरोग्य विभागाने खासगी डॉक्टरांना पालिकेकडे नोंदणी करण्याचे आवाहन वेळोवेळी केले आहे. वारंवार आवाहन करूनदेखील पालिकेच्या आरोग्य प्रशासनाला प्रतिसाद मिळत नसल्याने पालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी भरारी पथक स्थापन करून पालिका हद्दीतील खासगी डॉक्टरांची तपासणी मोहीम हाती घेण्याचे निश्चित केले आहे.

आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम लवकरच सुरू होणार आहे. या मोहिमेत डॉक्टरांची मान्यताप्राप्त मेडिकल कौन्सिलची डिग्री, मिळालेल्या डिग्रीच्या आधारावर रुग्णांचे उपचार होते का? प्रॅक्टिस करताना वैद्यकीय विभागाचे नॉर्म्स पाळले जातात का? आदींसह वैद्यकीय विभागाच्या निगडित चौकशी पालिकेचे पथक करणार आहे. वाढता बाल-माता मृत्यूदर कमी करण्याच्या दृष्टीने तसेच डेंग्यू आणि मलेरियासारख्या रुग्णांची अद्ययावत माहिती पालिकेला उपलब्ध होण्यासाठी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी पुढाकार घेतला आहे.

## एनएमएमटी प्रशासनाकडून आवाहन

**नवी मुंबई :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक कामकाजासाठी नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यास्तव १८ ते २० मे २०२४ रोजी निवडणूक कामकाज संपेपर्यंत कार्यक्षेत्रातील दैनंदिन बस प्रवर्तनाकरिता कमी बसेस उपलब्ध होणार असल्यामुळे वेळापत्रकात अनियमितता येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काही प्रमाणात होणाऱ्या गैरसोयीबाबत प्रवाशी जनतेकडून सहकार्य मिळणेस परिवहन प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे.

# धर्मवीरांच्या बालेकिल्ल्यावर भगवा फडकत राहिल -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे लोकसभा हा ऐतिहासिक मतदार संघ आहे. या मतदार संघातून रामभाऊ म्हाळगी, राम कापसे, जग्ननाथ पाटील, स्वर्गीय प्रकाश परांजपे यांनी नेतृत्व केले आहे. तर स्वर्गीय माँ साहेब यांचे ठाण्यावर खूप प्रेम होते. धर्मवीर आनंद दिघे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणार्या ठाणे लोकसभेवर महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या रुपाने शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांची प्रचाररॅली ऐरोली विधानसभा मतदार संघात काढण्यात आली. यात मुख्यमंत्री शिंदे सहभागी झाले होते. या वेळी त्यांच्या समवेत आमदार प्रताप सरनाईक, उपनेते विजय नाहटा, जिल्हाप्रमुख विजय चौगुले, संपर्क प्रमुख किशोर पाटकर, युवासेनेचे ममित चौगुले आदी मान्यवर आणि रॅलीत मोठया संख्येने शिवसेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

ऐरोलीत समारोपावेळी मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, नवी मुंबईतील गरजेपोटी बांधलेली घरे, घरांसाठी वाढीव एफ.एस.आय देण्यासाठी आम्ही धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यामुळे आगामी कालावधीत नवी मुंबईचा झपाट्याने विकास होईल. रस्ते, मेट्रो, उड्डाणपुल आणि विकास कामावर लक्ष केंद्रीत करण्यात आले असून मोदी सरकारची १० वर्षांची आणि २.५ अडीच वर्षात राज्यात झालेली विकासकामे पाहता जनता महायुतीच्या उमेदवाराला विजयी करेल, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

शिवसेना उपनेता विजय नाहटा यांनी नरेश म्हस्के यांच्या प्रचाररॅलीला मिळाल प्रतिसाद पाहता त्यांचा प्रचंड मताधिकार्यांनी विजय होईल. जनतेला खरे खोटे कळत आहे. त्यामुळे सुज्ञ जनता ही विकासाला साथ दिल्याशिवाय राहणार नसल्याने नाहटा म्हणाले.

जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांनी नरेश म्हस्के यांचा राजकीय प्रवास हा कष्टातून निर्माण झाला आहे. तळागाळातून म्हस्के पुढे आले आहेत. त्यांची जनतेशी नाळ जोडलेल्या ठाणे लोकसभा मतदार संघातून त्यांचा विक्रमी मतांनी विजय होईल, असा माझा विश्वास आहे.

## डीपीएस फ्लेमिंगो तलावावरील बंधाऱ्याची होणार चौकशी

**नवी मुंबई : बातमीदार**



डीपीएस तलावाला लागून सीआरझेड १ क्षेत्रावरील ६०० मीटर बेकायदेशीर बंधाऱ्याबाबत पर्यावरणवाद्यांच्या तक्रारीला उत्तर देताना केंद्राने महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाला चौकशी करण्याचे निर्देश दिले. नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या तक्रारीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेली खारफुटी समितीही साइटला भेट देणार आहे. नॅटकनेक्ट फाऊंडेशनने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

बंधारा आता तलावातील भरतीच्या पाण्याचा प्रवाह रोखणारा कच्चा रस्ता बनवल्याचा आरोप केला आहे. शिवाय, बंधारा एका बाजूला खारफुटीतून आणि दुसरीकडे पाणथळ जमीन कापतो, जे सीआरझेड १ नियमांचे स्पष्ट उल्लंघन आहे, असे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले. महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणानेमहाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला तक्रार तपासण्यास आणि अहवाल देण्यास सांगितले आहे. एमओईएफसीसीचे अधिकारी टी के सिंग यांनी त्यांच्या मेलमध्ये म्हटले आहे की, एमसीझेडएमए अशा समस्या तपासण्यासाठी पुरेशी सक्षम आहे.

दरम्यान, मॅन्ग्रोव्ह समितीने नॅटकनेक्ट तक्रारीची दखल घेतली आणि २९ मे रोजी साइटची तपासणी करण्यास सांगितले. १९९१ च्या सीआरझेड सूचनेव्यतिरिक्त, या बंधाऱ्याने सप्टेंबर २०१८ च्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाचा भंग केला आहे. या मोठ्या उल्लंघनासाठी सिडको ही या क्षेत्राची जमीनदार असल्याने साहजिकच जबाबदार आहे आणि हा कच्चा रस्ता ३०-एकर डीपीएस फ्लेमिंगो तलावात भरतीच्या पाण्याचा मुक्त प्रवाह रोखतो, असे कुमार यांनी तक्रारीत म्हटले आहे.

या भागातील खारफुटी अद्याप वनविभागाच्या ताब्यात येणे बाकी असल्याचे कुमार यांनी सांगितले. नॅटकनेक्टने सिडकोला परिसरातून मलबा आणि माती काढून भरतीच्या पाण्याच्या मुक्त प्रवाहासाठी मार्ग मोकळा करण्याचे आदेश देण्यासाठी सरकारच्या तात्काळ हस्तक्षेपाची विनंती केली. नॅटकनेक्टच्या विनंतीला पाठिंबा देत, सागर शक्तीचे प्रमुख नंदकुमार पवार म्हणाले की, अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याची वेळ आली आहे.

कच्चा रस्त्याने तीन पाण्याच्या प्रवाहा साठी जी व्यवस्था केली आहे ती देखील आता ब्लॉक झाली आहेत. याचा परिणाम म्हणजे डीपीएस फ्लेमिंगो तलावातील पाण्याचा प्रवाह वारंवार रोखला जातो. फेब्रुवारी १९९१ नंतर (जेव्हा सीआरझेड अधिसूचना जारी करण्यात आली होती) गुगल अर्थ नकाशांवर एक नजर टाकल्यास स्पष्टपणे दिसून येते की या विशिष्ट ठिकाणी रस्ता नव्हता. याउलट, ते दाट झाडे दाखवते जी खारफुटींशिवाय दुसरे काहीही असू शकत नाही, असे कुमार यांनी तक्रारीत म्हटले आहे.

नॅटकनेक्ट आणि इतर हरित गट जसे की नवी मुंबई एन्व्हायर्नमेंटल प्रिझर्व्हेशन सोसायटी, सेव्ह फ्लेमिंगो अँड मॅंग्रोव्हज, पारसिक ग्रीन्स आणि खारघर हिल आणि वेटलँड यांनी डीपीएस फ्लेमिंगो लेकच्या पाण्याचा प्रवाह वाचवण्याची मोहीम आधीच सुरू केली आहे. अलीकडे डीपीएस फ्लेमिंगो तलाव येथे १० पेक्षा जास्त फ्लेमिंगो मरण पावले, आणि अनेक जखमी झाले कारण ते कोरड्या तलावावर विचलित झाले, असे ग्रीन ग्रुप्सने सांगितले.

## एल.पी. उड्डाणपुलाच्या कामामुळे पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



एल.पी. उड्डाणपुलावर कॉंक्रिटीकरणाचे काम चालू असल्याने मुंबईकडे जाणाऱ्या हलक्या वाहनचालकांनी पामबीच मार्गाचा वापर करावा, असे आवाहन तुर्भे वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीकांत धरणे यांनी केले आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर शिरवणे उड्डाणपूल, एल पी उड्डाणपूल, उरण फाटा उड्डाणपूल, वाशी उड्डाणपूल, सानपाडा आणि तुर्भे या उड्डाणपुलांचा वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उत्तम उपयोग होतो. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या महामार्गासह उड्डाण पुलांची निर्मिती, देखभाल दुरुस्ती केली जाते. महामार्गावरील तसेच महामार्गावरून शहरांतर्गत होणारी वाहतूक सुरळीत राहावी यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग नवी मुंबई महानगरपालिकेचा शहर अभियंता विभाग आणि नवी मुंबई वाहतूक पोलीस विभाग यांचा चांगल्या प्रकारे समन्वय असतो. पावसाळ्यापूर्वी खड्डे मुक्त रस्ते असावेत आणि वाहतूक सुरळीत राहून वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पावसाळ्यात महामार्गावर नेहमी खड्डे पडणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून सदर ठिकाणी कायमस्वरूपी तोडगा काढण्याकरिता उपाययोजना करण्याच्या सूचना वाहतूक पोलीस विभागाकडून करण्यात येतात.

याच पार्श्वभूमीवर यापूर्वी एलपी उड्डाण पुलावरून पनवेलकडे जाणाऱ्या दिशेच्या मार्गिकांचे (लेनचे) कॉंक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले आहे. त्यानंतर आता पनवेलकडून मुंबईकडे जाणाऱ्या पुलावरील दोन मार्गिकांचे कॉंक्रीट करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. महामार्गावरील वाहतूक सुरळीत चालू राहावी यासाठी गर्दीच्या वेळी उड्डाणपुलाच्या दोन्ही दिशेला १० वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले आहेत. तसेच एखाद्या दुर्घटनेच्या वेळेस तातडीने नेरूळ पोलीस ठाण्याचे कर्मचारी यांची मदत घेतली जाते.

इतकेच नव्हे तर उड्डाणपूलाच्या ठिकाणी एखादी एखादे वाहन बंद पडल्यास ते त्वरित हटवण्यासाठी क्रेन तसेच टॉइंग व्हॅन यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या कामामुळे पुलावरील पनवेलहून मुंबईकडे जाणारी एक मार्गिका वाहतुकीसाठी रहात असल्याने वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता मुंबईहून पनवेलकडे येणाऱ्या एका मार्गिकेवर पनवेलहून मुंबईकडे जाणारी वाहने सोडण्यात आली आहेत.

एल पी नेरूळ येथे वाहतूक कोंडी होऊ नये आणि नागरिकांची गैरसोय होऊ नये याकरिता हलक्या वाहनचालकांनी पनवेलकडून मुंबईकडे जाताना पामबीच रोड या पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन धरणे यांनी केले आहे.

पान १ वरून

## वाढदिवसानिमित्त माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव






वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जि.प.सदस्य अमित जाधव, माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, राज पाटील, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, संजय भगत, दशरथ म्हात्रे, पनवेल शहर खजिनदार संजय जैन, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, नरेश ठाकूर, अमर पाटील, बबन मुकादम, अजय बहिरा, अमर ठाकूर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, प्रिया मुकादम, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, अभिजित जाधव, सत्यवान जाधव, अॅड. चेतन जाधव, विशाल ठाकूर, दर्शन ठाकूर, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, योगेश लहाने, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, किशोर चौतमोल, प्रशांत कर्पे, युवा नेते हॅप्पी सिंग, उमेश पोद्दार, सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, आप्पा भागीत, शिवाजी भगत, अविनाश गायकवाड, राजेश पाटील, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, काका भगत, चिन्मय समेळ, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी.गडदे, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, स्वप्नाली म्हात्रे, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, आदित्य ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन परेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करताना सर्वांना बरोबर घेऊन जाण्याच्या वृत्तीमुळे परेश ठाकूर लोकप्रिय झाले. सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांशी जोडली गेलेली नाळ हा त्यांचा आत्मा राहिला आहे. त्यामुळे अनेक संस्था, संघटना तसेच क्षेत्रांतील मान्यवर, हितचिंतकांनी वाढदिवसानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन केले.


## दुखवटा

### निर्मला नाईक



**पनवेल :** बामणडोंगरी येथील निर्मला शांताराम नाईक (वय ५४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. प्रेमळ स्वभाव राहिलेल्या निर्मला नाईक यांना आदराने 'नानी' या नावाने ओळखले जात होते. त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ व नातेवाईक उपस्थित होते. निर्मला यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. २६) श्री क्षेत्र लांगेश्वर येथे तर उत्तर कार्य बुधवारी (दि. २९) राहत्या घरी होणार आहे.

### सदानंद पाटील



**खोपोली :** खोपोली जनजागृती ग्राहक मंचाचे अध्यक्ष संजय पाटील यांचे वडील सदानंद विष्णू पाटील (वय ८४) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन सूना, चार नातवंडे, एक नात सून असा परिवार आहे. पत्नीचे २०२२ मध्ये निधन झाले.

### गुणाताई पाटील



**पनवेल :** शिवसेना उपजिल्हाप्रमुख व पनवेल तालुका रास्त भाव धान्य दुकान व रॉकेल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भरत पाटील यांच्या पत्नी व पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य गुणाताई भरत पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या अंत्ययात्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनधिकृत जाहिरात फलक निष्कासित

## पनवेल महापालिकेतर्फे तोडक कारवाई





**पनवेल : वार्ताहर**

मुंबईमधील जाहिरात फलक दुर्घटनेनंतर पनवेल महापालिकेनेदेखील शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांच्या विरोधात मोहीम सुरू केली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून पालिका क्षेत्रातील सर्व जाहिरात फलकांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. यामध्ये कामोठेमध्ये दोन, कळंबोलीमध्ये तीन, पनवेलमध्ये एक उपविभागीय नावडे येथे २७ अनधिकृत जाहिरात फलक आढळून आले आहेत, तर खारघरमध्ये एकही अनधिकृत जाहिरात फलक आढळले नाहीत. यामधील पाच अनधिकृत जाहिरात फलकांवर शुक्रवारी (दि.१७) निष्कासन महापालिकेच्या वतीने कारवाई करण्यात आली. मुंबईमधील जाहिरत फलक प्रकरणानंतर आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी महापालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

यानुसार या अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. महापालिका कार्यक्षेत्रात महापालिकेची रितसर परवानगी घेतलेले ८७ अधिकृत जाहिरात फलक आहेत. या सर्व जाहीरत फलकधारकांना मनपाकडील नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअरर्सकडून स्थिरता संरचनात्मक लेखा परीक्षण प्रमाणपत्र घेण्याविषयीच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

# खारघरमधील वाहतूक कोंडीची समस्या मार्गी

## भाजपचा यशस्वी पाठपुरावा; रहिवाशांकडून आभार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या पाठपुराव्यामुळे खारघर २, ८ आणि १० मधील नागरीकांची वाहतुक कोंडीची समस्या सुटली असून त्यांना आत्ता मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी तीन माकड चौकातून न जाता एक स्वतंत्र एक्झीट मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कामासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप नेते किर्ती नवघरे आणि माजी नगरसेवक नरेश ठाकूर यांनी पाठपुरावा करून हे काम पीडब्ल्यूडी विभागाकडून मंजुर करून घेतले होते. याबद्दल रहिवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर, किर्ती नवघरे आणि माजी नगरसेवक नरेश ठाकूर यांचे आभार मानले आहेत.



खारघर हिरानंदानी ब्रिजजवळ वाहतुक कोंडीची समस्या बिकट होत चालली असून नागरिकांना यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लगत होते. वाहतूक कोंडीमुळे प्रदुषानातदेखील वाढ होत असून इंधनाचेही नुकसान होत होते. यामध्ये प्रामुख्याने तीन माकड चौकात मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडीला नागरीकांना सामोरे जावे लागत होते. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप नेते किर्ती नवघरे आणि माजी नगरसेवक नरेश ठाकूर यांनी पाठपुरावा करून पीडब्ल्यूडीच्या कार्यकारी अभियंता कल्याणी गुप्ता यांच्या सोबत बैठक घेऊन ही समस्या मार्गी लावण्यासाठी मुंबई सायन हायवे वरील सेक्टर २ ग्लोमॅक्स मॉल, सेक्टर १० येथील हायवेब्रेक हॉटेल आणि सेक्टर ७ पोलीस स्टेशनजवळील चौकामधून कनेक्टीव्हीटी देण्याचे ठरले होते. त्यानुसार सेक्टर २ मधील ग्लोमॅक्स मॉल जवळील काम मंजुर झाले झाले असून या कामालादेखील सुरुवात झाली आहे तसेच लवकर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. हा मार्ग खुला झाल्यानंतर खारघर सेक्टर २, ८, १० मधील नागरिकांना आत्ता तीन माकडजवळील सिग्नलच्या दिशेने न जाता मुंइच्या दिशेने जाण्यासाठी स्वतंत्र एक्झिट मिळाली आहे.

नॅशनल हायवे ॲथिरीटी कडून सेक्टर १० आणि सेक्टर ७ या ठिणाच्या कामाची परवानगी न मिळाल्याने या कामाची सुरुवाती झाली नाहीये.

दरम्यान, भाजपचे नेते किर्ती नवघरे आणि माजी नगरसेवक नरेश ठाकूर यांनी या कामासंदर्भात अधिक माहिती देत आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले आहेत. तसेच सेक्टर १० हायवब्रेक हॉटेल आणि सेक्टर ७ पोलीस ठाण्या जवळून पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यास खारघर हिरानंदानी ब्रिज खाली होणारी वाहतूक कोंडी कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या वेळी भाजपचे उत्तर रायगड सचिव किर्ती नवघरे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, माजी नगरसेविका आरती नवघरे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

# दिवाळखोरीत गेलेल्या कंपनीची जमीन विकून उकळले कोट्यवधी

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळखोरीत काढलेल्या कंपनीची मालमत्ता विक्री करण्यास राष्ट्रीय लवादाने मनाई केली असतानादेखील कंपनीच्या संचालकाने या जमिनीचा एका बांधकाम व्यवसायिकासोबत १४ कोटी ३० लाख रुपयांमध्ये विक्री व्यवहार करून त्यापैकी सात कोटी ८६ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणातील कंपनीचा संचालक अमित अगरवाल याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

पनवेल मधील मौजे खानावळे येथील मे.सुप्रिया ट्रान्स्पोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि. या कंपनीची जमीन विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती नेरूळमध्ये राहणारे बांधकाम व्यावसायीक भिमेश मेहता (वय ४५) यांना गत ऑगस्ट २०२३ मध्ये मिळाली होती. जमीन विकत घ्यायची असल्याने मेहता यांनी कंपनीचे संचालक अमित अगरवाल यांची भेट घेतली होती. त्यावेळी अगरवाल याने जमिनीचे टायटल क्लियर असल्याचे सांगून कंपनीची कागदपत्रे दाखविल्यांनतर या दोघांमध्ये १४ कोटी ३० लाख रुपयांमध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला. त्यानंतर मेहता यांनी अगरवाल यांना सात कोटी ८६ लाख रुपये देऊन उर्वरीत रक्कमेचे चेकसुद्धा दिले होते. त्यांच्यामध्ये खरेदीखत झाल्यानंतर मे.सुप्रिया ट्रान्स्पोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि. या कंपनी विरोधात चालु असलेल्या विविध न्यायालयीन प्रकरणाबाबत मेहता यांना माहिती मिळाली. त्यानंतर मेहता यांनी त्याबाबत अधिक माहिती काढली असता, अमित अगरवाल याने त्याच्या मालकीची जमीन ॲक्सीस बँकेकडे तारण ठेवून बँकेकडून कर्ज घेतल्याचे व सदर कर्जाची मुदतीत परतफेड केली नसल्याची माहिती मिळाली. त्यामुळे मुंबई येथील राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाने सप्टेंबर २०२३मध्ये कंपनी दिवाळखोरीत काढुन त्या कंपनीच्या नावे असलेली कोणतीही मालमत्ता विक्री करण्यात येऊ नये, असे आदेश दिले होते.

यानंतरदेखील अमित अगरवाल यांनी याबाबतची माहिती लपवून जमिनीचे टायटल क्लियर असल्याचे भासवून बांधकाम व्यावसायीक भिमेश मेहता यांच्यासोबत खानावळे येथील कंपनीच्या मालकीच्या जमीनीचा विक्री व्यवहार करून फसवणुक केल्याचे आढळून आले. त्यानंतर मेहता यांनी नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे धाव घेऊन तक्रार दाखल केली होती.

# उभ्या गाडीला ट्रेलरची धडक; दोघे जखमी

**पनवेल :** जेएनपीटी ते पळस्पे रोडवर महात्मा फुले कॉलेजसमोरील रस्त्यावर उभ्या स्वीफ्ट डिझायर गाडीस पाठीमागून येणाऱ्या ट्रेलरने ठोकर मारून झालेल्या घटनेत दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

या ठिकाणी नादुरुस्त स्वीफ्ट डिझायर गाडी (एमएच १४-जेएल ९८८०) ही उभी असताना पाठीमागून येणाऱ्या ट्रेलर (एमएच ४३-सीई ८६२०) या वाहनावरील चालकाने स्वीफ्ट डिझायर गाडीला पाठीमागून ठोकर मारली. त्यानंतर स्वतः ताब्यातील वाहन उलटल्याने ट्रेलरचालक काकासाहेब बोटे व स्वीफ्ट गाडीचा चालक रवींद्र मालवणकर हे दोघे जखमी झाले असून या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे पथक, वाहतूक शाखेचे पथक व पनवेल अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना होऊन त्यांनी गाडी खाली अडकलेल्या चालकांना परिश्रम करून बाहेर काढले.

# पाणीटंचाईच्या झळा

**पनवेल, उरण :** तापमान वाढीमुळे अनेक जलसाठे आटले आहेत. बऱ्याच ग्रामीण भागात पाणीटंचाई जाणवतेय.

प्रशासनाकडूनही पाणीटंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सर्वच ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# वेश्वीच्या उपसरपंचपदी प्रमिला मुंबईकर



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील वेश्वी ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपच्या प्रमिला महेंद्र मुंबईकर यांची बिनविरोध निवड झाली.

वेश्वी ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये नऊ सदस्य संख्या असून यामध्ये अजित वसंत पाटील, सुनील विजयकांत तांबोळी, संदीप जयवंत पाटील, प्रमिला महेंद्र मुंबईकर, नूतन प्रीतम मुंबईकर, सोनाली विलास पाटील यांचा समावेश आहे, तर तीन अपात्र आहेत. अंतर्गत समझोत्यानुसार रिक्त झालेल्या जागी प्रमिला मुंबईकर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची शुक्रवारी (दि. १७) उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली. निवडणूक अधिकारी म्हणून बी.जी. वासांबेकर व ग्रामसेवक रेश्मा ठाकूर यांनी काम पाहिले.

या वेळी प्रल्हाद पाटील, नरेश म्हात्रे, संजय तांबोळी, रामनाथ मुंबईकर, जयराम मुंबईकर, नितीन मुंबईकर, शिवदास पालकर, जगदीश पाटील, रूपेश मुंबईकर, महेश नाईक, प्रकाश मुंबईकर, दिगंबर कडू, लक्ष्मण मुंबईकर, रमण पाटील, संदीप मुंबईकर, हरिदास मुंबईकर, सदाशिव मुंबईकर, रामनाथ मुंबईकर, अविनाश मुंबईकर आदी उपस्थित होते. दरम्यान, या वेळी कै. प्रताप नकुल मुंबईकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविक व आभार भाजपचे पनवेल शहर चिटणीस ॲड. विनायक मुंबईकर यांनी व्यक्त केले.



**पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांना लग्नाच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रवीण पाटील, भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# कळंबोली लोखंड पोलाद बाजार गोदामात गुटख्याची साठवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजाराच्या गोदामामध्ये यापूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून लाखो रुपयांचा मद्यसाठा जप्त केला होता. दोन दिवसांपूर्वी लोखंड पोलाद बाजारातील गोदाम क्रमांक ४४९ मध्ये चार लाख ८१ हजार ५०४ रुपयांचा गुटख्याचा साठा नवी मुंबई पोलिसांना सापडल्याने लोखंड पोलाद बाजारातील काळेधंदे पुन्हा एकदा उजेडात आले आहेत.

नवी मुंबई पोलीस दलाचे आर्थिक गुन्हे प्रतिबंध शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांना कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात अत्ताऊल्ला शेठ याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटख्याचा मोठा साठा असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर नवी मुंबई पोलीस दलाच्या अंमलीपदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निरज चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर बनकर, उत्तम लोखंडे, गणेश पवार, पोलीस नाईक संजय फुलकर यांच्या पथकाने सापळा रचून केलेल्या कारवाईमध्ये अताऊल्ला याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, तंबाखूचा साठा आढळला.



यापूर्वीसुद्धा याच परिसरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटख्याचा साठा अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पकडला होता. त्यानंतरसुद्धा अताऊल्ला याने गुटख्याचा साठा केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

अताऊल्ला याला पोलीस आणि अन्न औषध प्रशासन विभागातील काही कर्मचाऱ्यांची साथ असल्याने वारंवार कारवाई होऊनही पनवेल, कळंबोली, कामोठे, तळोजा या परिसरात राजरोज पानटपऱ्यांवर गुटख्याची विक्री सुरु आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नशामुक्त नवी मुंबई ही मोहीम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत पोलिसांचे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पथक अंमली पदार्थ विकणाऱ्यांना पकडत आहे, मात्र पोलीस व अन्न औषध प्रशासन विभागातील काही नतद्रष्ट कर्मचाऱ्यांमुळे अंमली पदार्थ पकडण्यासाठी नेमलेल्या पोलिसांना गुटखा विक्रीकडे लक्ष्य केंद्रित करावे लागत आहे. अताउल्ला याची सखोल चौकशी केल्यावर त्याने एवढा मोठा गुटख्याचा साठा कुठून आणला. तसेच गोदामात पोलिसांनी धाड टाकण्यापूर्वी आणि धाड टाकल्यानंतर त्याने कोणकोणत्या पोलिसांना व सरकारी अधिकाऱ्यांना संपर्क केला याची सखोल चौकशी केल्यास पनवेलचा अवैध गुटखा व्यापारावर काही प्रमाणात प्रतिबंध लागू शकेल.

# न्हावाशेवा उड्डाणपुलाची दुरुस्ती कामे लवकर करण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीएला जोडणाऱ्या न्हावाशेवा पोलीस ठाण्यानजीकच्या उड्डाणपूलाचे दुरुस्ती काम लवकरात लवकर करण्याची मागणी होत आहे. ऐन पावसाच्या तोंडावर या पुलाची दुरुस्ती सुरू करण्यात आली आहे. आधीच पुलावरील खड्ड्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना आता या दुरुस्तीच्या कामाचा त्रास सहन करावा लागणार आहे. मागील अनेक महिन्यापासून या पुलावरील खड्ड्यातील खडीमुळे मातीचा धुरळा झाला आहे. याचा त्रास या मार्गाने जेएनपीटी बंदरात ये-जा करणाऱ्या कामगार, कर्मचारी व बंदरावरील उद्योगात काम करणाऱ्या तसेच उड्डाणपुलावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे.

जेएनपीए बंदरात बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर सिंगापूर (बीएमसीटी) बंदर उभारण्यात आले आहे. चौथे बंदर म्हणून ही बंदराची ओळख आहे.

पुलावरून दररोज हजारो जड कंटनेर वाहने प्रवास करीत आहेत. त्यांच्या वजन व दाबामुळे पुलाच्या दुरुस्तीसाठी टाकण्यात आलेल्या खडीचे रूपांतर धुळीत होत आहे. पुलावरील सततच्या वाहतुकीमुळे येथील प्रवाशांना प्रचंड धुरळायुक्त मार्गावरून प्रवास करावा लागत आहे.

### अपघाताचा धोका

जेएनपीए बंदराला जोडणाऱ्या या उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम वारंवार करूनही पुलाची दुरवस्था कायम आहे. या पुलावरील डांबर निखळून खड्डे पडण्याची समस्या कायम आहे. त्यामुळे येथील वाहनचालक व प्रवाशांकडून मागणी होत आहे तसेच अपघाताचा धोका वाढला आहे.



# उरण पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी राजेंद्र कोते

**उरण : रामप्रहर वृत्त**

नागरिकांनी निर्भयपणे राहवे, नागरिकांच्या रक्षणासाठी पोलीस प्रशासन सदैव तत्पर आहे. महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना करण्यात येतील व समाजात जातीय सलोखा टिकून राहण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे प्रतिपादन उरण पोलीस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कोते यांनी केले.



उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिष निकम यांची गुरुवारी (दि.१६) रात्री नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात बदली झाल्याने त्यांच्या जागी न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कोते यांनी शुक्रवारी (दि.१७) उरण पोलीस ठाणे वरिष्ठ निरीक्षकपदाचा कार्यभार स्वीकारला. कर्तव्यदक्ष, कार्यतत्पर तसेच वेळप्रसंगी कर्तव्यकठोर अशी त्यांची पोलीस खात्यात विशेष ओळख आहे. वपोनि राजेंद्र कोते यांनी अल्पावधीतच त्यांनी विविध गुन्ह्यांचा छडा लावला असून गुन्हेगारांचा मूसक्या आवळल्या आहेत. पोलीस खात्यात त्यांनी केलेल्या धाडसी कामगिरीबद्दल त्यांना अनेकदा गौरविण्यातही आले आहे.

राजेंद्र कोते हे मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील असून १९९५ साली सरळसेवा भरती परीक्षेत महाराष्ट्र पोलीस दलात रुजू झाल्यानंतर गुणवत्तेच्या आधारे पोलीस दलात अनेक ठिकाणी त्यांनी महत्वाच्या पदावर काम केले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत उत्कृष्ट कामगिरी करून सन २०१४ ते २०१७ यादरम्यान पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ आणि शहर हद्दीत निजामपुरा पोलीस ठाणे, मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर येथे पोलीस निरीक्षकपदी त्यांनी उत्तम कामगिरी केली.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शनाखाली आता त्यांच्यावर उरण पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदाची जबाबदारी देण्यात आली असून समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासोबतच जातीय सलोखा, महिला सुरक्षितता व गुन्हेगारी प्रवृत्तीला अल्पावधीतच आळा घालण्यात ते यशस्वी होतील, असा विश्वास सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# 'शराबी' ४० वर्ष
## अमिताभचा वन मॅन शो

*मुछे हो तो नत्थूलाल जैसी हो वरना नहीं हो,*
*कलाकार सिर्फ तारीफ का भूखा होता है, पैसे का नहीं,*
*मै एक कलाकार हूं, मक्कार नही,*
*हमारी जिंदगी का तंबू तीन बम्बुओं पर खडा हुआ है, शायरी शबाब और आप,*
*तोहफा देने वाली की नियत देखी जाती है, तोहफे की किमत नही,*
*जिसने पी नही व्हीस्की, किस्मत फूट गयी उसकी,*

...प्रकाश मेहराच्या दिग्दर्शनातील शराबी (मुंबई रिलीज १८ मे १९८४) हे अमिताभ बच्चनने आपल्या शैलीत साकारलेले हे संवाद पडद्यावर आले रे आले की थेटरातील टाळ्या, शिट्ट्या हमखास उमटणारच. या सुपर हिट पिक्चरच्या मुंबईतील प्रदर्शनास चाळीस वर्ष झालीदेखील तरी आज यू ट्यूबवर शराबी एन्जॉय करताना तीच रंगत.





चित्रपटाच्या पडद्यावरील शराबी (दारूड्या शब्द अगदीच सुमार वाटतो) म्हटलं तरी अमिया चक्रवर्ती दिग्दर्शित 'दाग', बिमल रॉय दिग्दर्शित 'देवदास' यापासून अनेक पिक्चर आहेत आणि अनेक गाण्यातही 'शराबी'पण आहेच. यह जो मोहब्बत है (कटी पतंग), जाम मे डूब रही यारों मेरी जीवन की हर शाम (नमक हराम) वगैरे अनेक. फिल्मी पार्टीतील 'दारूकाम' म्हटलं तरी राज कपूरच्या पार्ट्यांचे अनेक किस्से, कथा, दंतकथा कायमच चघळून सांगितल्या जातात.

**झूम प्रहर**




**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

पिक्चरचं नावच शराबी हे एकदम थेटच सांगते की ही गोष्ट दारूचं भारीच व्यसन लागलेल्या माणसाची आहे. ही सुचली कशी यामागेही एक गोष्ट आहे. मनमोहन देसाई दिग्दर्शित 'कुली'च्या बंगळुरू येथील मारहाणीच्या दृश्यात पुनीत इस्सारचा ठोसा चुकवण्याच्या प्रयत्नात टेबलाचा कोपरा पोटात लागल्याने जखमी आणि मग आजारी झालेल्या अमिताभने १९८३च्या जानेवारीपासून पुन्हा शूटिंगला सुरुवात केली. काही महिन्यांतच चित्रपटसृष्टीतील काही स्टार, निर्माते, दिग्दर्शक, गायक, संगीतकार असा समूह विदेशात स्टेज शोसाठी (मेगा इव्हेंट) गेला. त्यात न्यूयॉर्क ते त्रिनिदाद टोबॅगो अशा विमान प्रवासात प्रकाश मेहरा अमिताभच्या शेजारी येऊन बसला आणि गप्पांच्या ओघात म्हणाला, आपण एक पिता व पुत्र यांच्या नात्यावर एक चित्रपट बनवूया. आपल्या बिझनेसमध्ये कमालीचा बिझी असलेल्या उद्योगपतीचा मुलगा आपल्या श्रीमंत घरातील मुन्शीच्या सहवासात राहून मोठा होतो, पण घरातच प्रेम मिळत नाही. म्हणून कमालीचा दारूच्या आहारी जातो. या नात्यातील तणाव, संघर्ष यांची गोष्ट. चित्रपटाचे नाव शराबी.

अटलांटा महासागरातून पस्तीस हजार फूटांवरून विमान जात असताना ठरलं, 'शराबी'ची निर्मिती करायची. ही गोष्ट खुद्द अमिताभनेच एका मुलाखतीत रंगवून खुलवून सांगितलीय.

प्रकाश मेहरा सिनेमात पुरता मुरलेला माणूस. माझ्या आवडत्या दिग्दर्शकांतील एक. गीतकार बनायला तो चित्रपटसृष्टीत आला, मग दिग्दर्शक झाला, अन्य निर्मात्यांचे चित्रपट दिग्दर्शित करीत असतानाच स्वत: जंजीर (१९७३)पासून निर्माताही झाला. 'समाधी'च्या दिग्दर्शनात मग्न असतानाच धर्मेंद्रच्या तारखांचा काही मेळ लागेना. त्यात त्याची दुहेरी भूमिका. आशा पारेख व जया भादुरी या दोन नायिका. अशातच एक अल्पावधीत एक चित्रपट बनवू असा विचार करीत 'जंजीर' बनवायचे ठरले. जयानेच प्रकाश मेहरांना अमिताभचे नाव सुचवले आणि पटकथाकार सलीम जावेद जोडीतील जावेद अख्तर यांनी एस. रामनाथन दिग्दर्शित 'बॉम्बे टू गोवा' (१९७२) पाहून अमिताभचे नाव निश्चित करण्याचा सल्ला दिला. पुढचा इतिहास सर्वज्ञात आहे.






अमिताभच्या चित्रपटांच्या दिग्दर्शकांत मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा माझे जास्त आवडते. मेहरांनी तर अमिताभला विविध रूपात पडद्यावर आणले. 'जंजीर'नंतर 'हेरा फेरी' (१९७६), 'मुकद्दर का सिकंदर' (१९७८), 'लावारीस' (१९८१), 'नमक हलाल' (१९८२), 'शराबी' (१९८४), 'जादुगर' (१९८९) हे या जोडीचे चित्रपट. 'खून पसिना' (१९७७)चे निर्माते प्रकाश मेहराच होते. त्यांनी आपला सहाय्यक दिग्दर्शक राकेशकुमारला स्वतंत्रपणे चित्रपट दिग्दर्शनाची संधी दिली. या जोडीचे यशाचे प्रगती पुस्तक भारी गुणांचे आहे. फक्त 'जादुगर' दाणकन आपटला आणि ही जोडी कायमची फुटली. त्याची सुरुवात 'शराबी' पूर्ण होत असतानाच सुरू झाली...

आजारपणातून बरे झाल्यावर अमिताभचे लक्ष आता सेटवर गेलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'शराबी' आणि टी. रामाराव दिग्दर्शित 'इन्कलाब' या चित्रपटांवर होते. वक्तशीर, मेहनती, व्यावसायिक व कामाची योग्य नियोजन करणाऱ्या अमिताभने सगळी आखणी करेपर्यंत 'शराबी'ची पटकथा लक्ष्मीकांत शर्मा यांनी लिहिली. कादर खानने संवाद लिहिले. निर्माते सत्येन पाल चौधरी यांनी भरभर सगळी आखणी केली. प्रकाश मेहरा अन्य कलाकारांच्या निवडीत गुंतले. राकेश रोशन निर्मित व के. विश्वनाथ दिग्दर्शित 'कामचोर' (१९८२)च्या यशानंतर जयाप्रदाला मोठ्याच प्रमाणावर हिंदीत ऑफर होती. तिने 'शराबी' साईन तर केला, पण तारखांची समस्या निर्माण झाल्याने राकेश रोशन निर्मित व के. विश्वनाथ दिग्दर्शित 'जाग उठा इन्सान' सोडावा लागला. तो श्रीदेवीला मिळाला. ही साईड स्टोरी.

'शराबी' विक्की कपूर अमिताभ हे निश्चित होतेच. जयाप्रदाही ठरली. विक्कीच्या पित्याच्या अमर नाथ यांच्या भूमिकेत प्राण तसेच ओम प्रकाश (मुन्शी फुलचंद), रणजित, भारत भूषण (मास्टरजी) यासह चंद्रशेखर, आशालता, जानकीदास, सत्येन कप्पू, दीपक पराशर, ए.के. हनगल आणि विशिष्ट पद्धतीच्या मिशीत मुकरी.

तब्बल दोन तास छप्पन मिनिटे या अवधीच्या शराबीत बिझी उद्योगपती पिता आणि त्यामुळेच दारूच्या आहारी गेलेला पुत्र. (शराब की बोतल पर अगर मै लेबल की तरह चिपक गया हू तो उस लेबल को चिपकानेवाले आप है, हा संवाद बरेच काही सांगतो. यह इंसान नही है, यह तो मशीन है ऐसी मशीन जो सिर्फ नोट छापती है और नोट खाती है अशी या पुत्राची खंत) पिता बिझी म्हणून घरातील मुख्य नोकर या मुलाला सांभाळतो. त्याला नायिकेकडून प्रेम मिळते. (जिनका अपना दिल तुटा होता है, वो दुसरों का दिल नही तोडा करते) पटकथेत अनेक गोष्टी घडत घडत रंगत वाढते आणि त्यात मनोरंजनाची भट्टी आणि पट्टी जमते ती गीत संगीत व नृत्याने. संगीत बप्पी लाहिरीचे आहे. प्रकाश मेहरा यांनी जहा चार यार मिले (पार्श्वगायक किशोरकुमार व अमिताभ), इंतेहा हो गयी (आशा भोसले व किशोरकुमार) ही गाणी लिहिली. अंजान यांनी मुझे नौलखा मंगवा दे (आशा भोसले व किशोरकुमार), दे दे प्यार दे प्यार दे (आशा भोसले व किशोरकुमार), मंझिले अपनी जगह है (किशोरकुमार), लोग कहते है (आशा भोसले व किशोरकुमार) ही गाणी लिहिली. ही गाणी लांबलचक असूनही कंटाळा येत नाही. जहा चार यार गाण्यात एका कडव्यात महाराष्ट्रीय रूपात स्मिता पाटील आहे. (नमक हलालसाठी शूटिंग केलेला हा भाग यात वापरला. हेतू एकच, चित्रपट रसिकांचे मनोरंजन मनोरंजन मनोरंजन). इंतेहा हो गई हे गाणे अमेरिकेत गाणे द रनर यावर बेतलयं. या चित्रपटाचे संवादही लांबलचक होते. ते कायम ठेवले तर पिक्चर पाच तासांचा होईल अशी अमिताभने व्यक्त केलेली भीती मेहरा यांनी स्वीकारली.

सगळं कसं आकार घेत होते असे तुम्हाला वाटेल. तसे अनेकदा नसतेच. अशातच दिवाळी आली. आणि आपल्या प्रतिक्षा बंगल्यावर फटाके फोडत असतानाच अमिताभच्या डाव्या हाताला जखम झाली. आता शूटिंग रखडणार हे उघड होते, पण अमिताभ थांबायला तयार नव्हता. त्याने एक मार्ग काढला. डावा हात शर्ट अथवा कोटाच्या खिशात ठेवून शूटिंग सुरू केले. तो 'शराबी' असल्याने तो असे करू शकतो हे त्यामागचे लॉजिक. पण चक्क ते फळले. ती जणू स्टाईल वाटली.



त्या काळात मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांच्यात भारीच तू तू मै मै चालायचं. मनजी मेहराना खिजवत म्हणाले, एक शराबी ही शराबी फिल्म ही बना सकता है, असली मर्द ही मर्द फिल्म बना सकता है.... प्रकाश मेहरा काही कमी नव्हते. त्यांनीही तेवढेच टोकदार उत्तर दिले, एक कुली ही कुली फिल्म बना सकता है, इतनी उंची बाते कर सकता है... हा शाब्दिक हल्ला प्रतिहल्ला त्या काळात खूपच गाजला. मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांच्यातील वाद सर्वश्रुत. या दोघांच्याही चित्रपटात दोन जण कॉमन असत. अमिताभ व कादर खान. (कालांतराने अमिताभने कादर खानला दूर केले ती गोष्ट वेगळीच). अमिताभने 'इंडिया टुडे'च्या मुखपृष्ठासाठी आपण, मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा असा अतिशय दुर्मीळ योग जुळवून आणला. फार गाजलं हो ते फोटो सेशन.

'शराबी' रिलीजसाठी तयार होता होता चित्रपटाचे पार्श्वसंगीत वगैरेवरून अमिताभ व प्रकाश मेहरांमध्ये तू तू मै मै सुरु झाली. चित्रपट रिलीज होऊन सुपरहिटही झाला. मेहरांना वाटलं, बस्स झाला अमिताभ. त्यांनी शत्रुघ्न सिन्हाला घेऊन 'ज्वालामुखी' तर राजकुमारला घेऊन 'मोहब्बत के दुश्मन' व 'मुकद्दर का फैसला' बनवले. फ्लॉपची हॅट्ट्रिक झाली हो. मेहरा परत अमिताभकडे आले. आता अमिताभचा सल्ला महत्त्वाचा होता. 'जादुगर 'चा उत्तरार्ध त्याने बराच बदलून घेतला यावर गॉसिप्स मॅगझिनमधून बरेच उलटसुलट आले. पिक्चर मात्र फ्लॉप झाले नि ही जोडी कायमची फुटली.

अमिताभच्या साठीच्या निमित्ताने मुंबईतील एका मराठी वृत्तपत्राच्या रविवार पुरवणीसाठी प्रकाश मेहरा यांच्या मुलाखतीचा योग आला असता, 'जंजीर'साठी अमिताभला कसा निवडला हे अतिशय मनापासून सांगितले. (ते याच लेखात वर दिलेय) आताही आपल्याकडे अमिताभसाठी एक चांगली पटकथा आहे. भेटीसाठी कधी वेळ देतोय याची वाट पाहतोय, मेहरांच्या बोलण्यात आत्मविश्वास कमी, पण उसने अवसान जास्त होते... अर्थात हा योग जुळून आलाच नाही. या जोडीने भरपूर मनोरंजन दिले. 'शराबी' त्यातील धमाकेदार.

# मतदानाची टक्केवारी अंतिम करण्याची प्रक्रिया पारदर्शक

भारत निवडणूक आयोगाने झालेल्या मतदानाची टक्केवारी सर्वांना कळावी म्हणून वोटर टर्नआऊट अॅप (Voter Turnout App) तयार केलेले आहे. हे अॅप गुगल प्ले स्टोर व अॅपल स्टोरवर अथवा आयोगाच्या वेबसाईटवर सहज उपलब्ध आहे आणि कोणीही डाऊनलोड करून त्याचा उपयोग करू शकतो. यावर मतदानाच्या दिवशी सकाळी ९ वा.नंतर दर दोन तासांनी झालेल्या मतदानाची अंदाजित टक्केवारी जाहीर करण्यात येते. मतदानाची प्रत्यक्ष टक्केवारी आणि अॅपवर दिसत असलेली टक्केवारी यामध्ये थोडाफार फरक पडू शकतो हे स्वाभाविक आहे. या अॅपवर राज्य, लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघ यातील अंदाजित टक्केवारी उपलब्ध होते. हे अॅप डाऊनलोड करून वापरण्याची लिंक सोबत जोडली आहे.


https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.eci.pollturnouthl=enšIN

https://apps.apple.com/in/app/voter-turnout-app/id1536366882

दर दोन तासांप्रमाणे मतदानाच्या दिवशी सायंकाळी ५ वाजताची अंदाजित टक्केवारी बघता येते. काही मतदान केंद्रावर संध्याकाळी ६ वाजण्याच्या आत म्हणजे मतदानाची वेळ संपण्याच्या आत मतदान केंद्रांवर दाखल झालेल्या मतदारांना टोकन देऊन सर्वांचे मतदान पूर्ण होईपर्यंत मतदान चालू राहते. काही मतदान केंद्रांवर अगदी रात्री ९ वाजेपर्यंत मतदान चालू असण्याची उदाहरणे आहेत.



मतदान संपल्यानंतर सर्व मतदान पथके विधानसभेच्या मुख्यालय असलेल्या ठिकाणी येऊन मतदान यंत्रे, केंद्राध्यक्षांची डायरी व इतर कागदपत्रे सादर करतात. काही मतदान केंद्रे दुर्गम भागात तसेच विधानसभा मुख्यालयापासून दूर असल्यामुळे तेथील मतदान पथकांना मुख्यालयी पोहचण्यास उशीर होतो किंवा कधी कधी पाऊस अथवा वाहतुकीचा अडथळा यामुळेदेखील उशिर होऊ शकतो. पूर्णपणे पोलीस बंदोबस्तामध्ये विधानसभा मुख्यालयात पोहचल्यानंतर सर्व मतदान यंत्रे सुरक्षितरित्या क्रमवार एकत्र लावून लोकसभा मतदार संघाच्या मुख्यालय किंवा जिल्हा मुख्यालयामध्ये येण्यासाठी कडक पोलीस बंदोबस्त आणि व्हिडीओच्या निगराणीमध्ये सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार यांना सूचित केल्यानंतरच मतदान यंत्राचा प्रवास चालू होतो. अनेक ठिकाणी मतदान यंत्रे आणि संबंधित कागदपत्रे मतमोजणी केंद्राच्या शेजारी असलेल्या स्ट्राँगरूममध्ये पोहोचायला दुसऱ्या दिवशी सकाळ किंवा अगदी दुपार होते. दरम्यानच्या काळात दूरध्वनी संदेशानुसार घेतलेल्या माहितीच्या अनुषंगाने मतदानाच्या दिवशी मध्यरात्रीपर्यंत पुन्हा एकदा अंदाजित टक्केवारी निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी



Encore या भारत निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरद्वारे वोटर टर्नआऊट अॅपवर जाहीर करतात. ही जाहीर करण्यात आलेली टक्केवारी Close of Poll म्हणजे मतदान संपल्यानंतरची अंदाजित टक्केवारी असते.

केंद्राध्यक्षांची डायरी आणि इतर कागदपत्रांवरून खात्री करून जाहीर करण्याची टक्केवारी मतदानाच्या दुसऱ्या दिवशी रात्रीपर्यंत तयार होते आणि लगेचच निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून भारत निवडणूक आयोगाच्या Encore या सॉफ्टवेअरवर भरण्यात येते आणि तिच टक्केवारी वोटर टर्नआऊट अॅपवर प्रसिद्ध करण्यात येते. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी संपूर्ण आकडेवारीची माहिती घेऊन खात्री केल्यावरच त्यावर शिक्कामोर्तब होऊन मतदानाची अंतिम टक्केवारी वोटर टर्नआऊट अॅपवर प्रसारित होते. त्याला end of poll अंदाजित टक्केवारी म्हणतात. यासाठी मतदानाच्या दिवसाच्या दुसऱ्या दिवशी रात्री ही समय मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे.

वोटर टर्नआऊट अॅपवर मतदानाची अंतिम टक्केवारी सर्व मतदान केंद्रावरील माहिती एकत्र होऊन मतदानाच्या दुसऱ्या दिवशी मध्यरात्री जाहीर होते. ही सर्व टक्केवारी अंदाजित असते. याचे कारण उघड आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर जेव्हा मतदान संपते तेव्हा त्या मतदान केंद्रात झालेल्या मतदानाची संख्या आणि टक्केवारी प्रत्येक मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या राजकीय पक्ष अथवा उमेदवारांच्या प्रतिनिधींकडे केंद्राध्यक्षांच्या स्वाक्षरीनिशी सुपूर्द केलेली असते. प्रत्येक मतदान केंद्रावरील ही संख्या आणि टक्केवारी हा संपूर्ण आकडेवारीचा मूळ आधार असतो. महाराष्ट्र राज्यामध्ये यंदाच्या लोकसभा निवडणुकीसाठी एकूण मतदान केंद्रांची संख्या ९८ हजारच्या आसपास होती. यावरून ही आकडेवारी तयार करण्याचे काम किती मोठे आहे याची कल्पना करता येते.

एखाद्या राजकीय पक्षाने नियुक्ती केलेल्या सर्व मतदान केंद्रांवरच्या प्रतिनिधींकडून केंद्राध्यक्षांच्या स्वाक्षरीनिशी प्राप्त झालेल्या मतदानाची संख्या आणि टक्केवारीची तुलना केल्यास मतदानाच्या दुसऱ्या दिवशी मध्यरात्री जाहीर झालेल्या टक्केवारीशी निश्चितपणे जुळेल तरीदेखील वोटर टर्नआऊट अॅपमध्ये अंतिम टक्केवारीला Approximate असेच म्हटले आहे. त्याचे कारण असे की, ही अंतिम टक्केवारी केंद्राध्यक्षांच्या डायरीशी आणि राजकीय अथवा उमेदवारांच्या मतदान केंद्रातील उपस्थित प्रतिनिधींकडे दिलेल्या संख्येशी जुळत असली तरी मतमोजणीच्या दिवशी त्यामध्ये पोस्टल बॅलेटद्वारे झालेल्या मतदानाची संख्या समाविष्ट केली जाते. त्यामुळे मतदानाची संख्या आणि एकूण टक्केवारी यांच्यात मतमोजणीच्या दिवशी किंचीतशी वाढ दिसून येते. वोटर टर्नआऊट अॅपवर मतदानाच्या दिवशीच्या दुसऱ्या दिवशी मध्यरात्री दिसणारी अंतिम टक्केवारी ही मतदान यंत्रावरील मतदानाची टक्केवारी असते. त्यामध्ये Election Duty Certificate (EDC) मतदारांनी मतदान यंत्रात केलेल्या मतदानाची संख्या समाविष्ट असते. त्याबाबतची नोंद संबंधित केंद्राध्यक्षाने डायरीत घेऊन त्याची माहिती मतदान केंद्रातील प्रतिनिधींना दिलेली असते.

सर्व रचना लक्षात घेतल्यास या रचनेमध्ये बारकाईने विचार करून त्याचे काटेकोर असे कार्यवाहीचे टप्पे भारत निवडणूक आयोगाने गेल्या लोकसभा निवडणूकीपासूनच निश्चित केलेले आहेत. ही पद्धत आता चांगली प्रस्थापित झालेली असून पारदर्शकतेचे उत्तम उदाहरण आहे.

मतदानाच्या टक्केवारीत होणारे बदल याबाबत चर्चा करताना सर्वांनी ही प्रक्रिया नीट समजावून घेणे आवश्यक आहे. अन्यथा गैरसमज अथवा अफवा पसरु शकते आणि उपयुक्त तंत्रज्ञानाची सुविधा आपल्या सगळ्यांच्या हाती असूनही तिचा सुयोग्य उपयोग होत नाही, अशी परिस्थिती होऊ शकते.

**-डॉ.किरण कुलकर्णी,**
**अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र**

# 'अवकाळी'मुळे विविध घटकांना फटका

## आंबा बागायतदार, वीटभट्टी मालक, मेंढपाळांचे नुकसान

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मागील पाच दिवस खोपोली-खालापूर परिसरात दररोज अवकाळी पाऊस कोसळला. वादळी वारा व गारांचा अवकाळी पावसामुळे येथील आंबा बागायतदार व वीटभट्टी मालकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. दुसरीकडे विविध क्षेत्रासाठी लागणारे व उघड्यावर राहणारे मजूर व त्यांचे कुटुंबीय, घाट माथ्यावरून दाखल झालेले मेंढपाळ वर्ग हे ही या अवकाळी पावसामुळे पुरते हैराण झाले आहेत.





खोपोली व खालापूर परिसरात मागील पाच दिवस दररोज दुपारनंतर तर कधी रात्रीच्या वेळेत जोरदार वादळ सह मुसळधार अवकाळी पाऊस पडत आहे. या परिसरात उन्हाळ्यात पावसाळी वातावरण बनले आहे. या अवकाळी पावसामुळे अंगाला लाई आणणारी उष्णता कमी झाली म्हणून, सर्वसामान्य नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असून, दुसरीकडे या अवकाळी पावसामुळे आंबा बागायतदार, उन्हाळी भाजीपाला लागवड करणारे शेतकरी, वीटभट्टी मालक व बांधकाम व्यावसायिक यांचे मात्र मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

उन्हाळी दिवस म्हणून विविध भागांतील मजूर खोपोली व परिसरात वास्तव्यास येतात. यातील बहुतांश मजूर बांधकाम क्षेत्राशी संबंधित असतात. हे मजूर त्या त्या साईडवर तात्पुरता निवारा उभारून राहतात, मात्र दररोज वादळी वारा व गारांसह पडणाऱ्या अवकाळी पावसाने मजूर वर्ग त्यांचे कुटुंबाचे जीवन जगणे कठीण बनविले आहे. दिवाळीनंतर घाटमाथ्यावरून मोठ्या प्रमाणावर मेंढपाळ कुटुंबे रायगड जिल्ह्यात पाच महिन्यासाठी दाखल होतात.

या मेंढपाळ समूहाचे वास्तव ही तात्पुरत्या स्वरूपाचे व उघडयावर असते. त्यांचे ही या अवकाळी पाऊसामुळे मोठ्या प्रमाणावर गैरसोय व नुकसान होत आहे.

# पावसाळ्यातील अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांची आढावा बैठक

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळ्यात मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर होणारे अपघात रोखण्यासाठी आणि प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी आयआरबी, वाहतूक पोलीस आणि विविध कंपन्या यांची आढावा बैठक झाली असून हे अपघात रोखण्यासाठी महामार्गे पोलीस अलर्टमोड वर आले असून उपाययोजना करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

ही बैठक आयआरबी कॉन्फरन्स हॉल खालापूर टोलनाका येथे झाली. या बैठकीत मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अपघाताची मालिका सतत सुरूच असून बोरघाटात जास्त अपघात होत असतात त्यातच आता पावसाळा सुरू होणार असल्याने अपघात रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनेवर ही बैठक झाली.

यात मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर पावसाळ्यात दरड कोसळणे, वाहने घसरून अपघात होणे, पूर परिस्थिती, रस्त्यांची प्रलंबीत कामे, वाहतूक कोंडी यावर उपाय योजनेबाबत बैठक झाली असून यात सर्वच यंत्रणांना अलर्ट राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या बैठकीला पोलीस अधीक्षक रायगड परीक्षेत्र तानाजी चिखले, पोलीस उपअधीक्षक घनश्याम पलंगे, पोलीस निरीक्षक पनवेल रायगड विभाग प्रभारी अधिकारी, बोरघाट, पळस्पे, वाकण व महाड, एमएम आरडीसी, राष्ट्रीय रस्ते प्राधिकरण, विभाग, आयआरबी, सार्वजनिक बांधकाम विभाग, जे. एम. म्हात्रे एन्फ्रास्टचर, न्यू मेरिको कंपनी, मोर्स टेक्नो कोरपोरेट, नवयुग इंजिनिअर कंपनी, मे अफकोन कंपनी, सेव्ह लाईव्ह फाउंडेशन, ब्लुम कंपनी, कल्याण टोल इन्फ्रास्टचर, राष्ट्रीय रस्ते प्राधिकरण, उपविभाग चेतन इन्फ्रास्टक्चर, एल अँड टी महाड, प्रल्हाद देशमुख इन्फ्रास्ट्रचर, अक्षय एन्फ्रास्टचर, अश्या विविध विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी हजर होते.

बैठकीत प्रलंबित कामाविषयी सूचना देण्यात आल्या असून त्यांचे १५ दिवसांच्या आत केलेल्या कारवाईचा अहवाल मागविला आहे.



# जोरदार वाऱ्यामुळे आंबा पीक वाया; शासनाकडून भरपाई मिळण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

सध्या मुरूड तालुक्याचे तापमान ३६ डिग्री सेल्सियस पेक्षा जास्त असल्याने आंब्यावरील मोहर करपला आहे. बहुतेक आंबा झाडावर फळच उगवले नाही. त्यामुळे यंदा आंबा पीक ४० टक्के पेक्षा कमी येणार असे निश्चित मानले जात होते.

मे शेवट आला तरी आंब्याचे पीक सुरूच आहे, परंतु या आंबा पिकाला पावसाळी वाऱ्याची झळ लागून शेकडो आंबा उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेवटच्या टप्पात आंबा पीक आले, परंतु पावसाळी चाहूल लागून जोरदार वारे सुटल्याने असंख्य आंबा उत्पादकांचे आंबे झाडावरून पडून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

अखेरच्या टप्पात आलेले पीक वाया गेल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. कोकण किनार पट्टीवर आंबा हे पीक मोठ्या प्रमाणत घेतले जाते, परंतु पावसाळी हवामानाची चाहूल लागून रोज सायंकाळच्या दरम्यान जोरदार वारा सुटून नुकतेच आलेले पीक वाया गेल्याने आंबा उत्पादक चिंतेत पडले असून शासनाने आम्हाला भरपाई द्यावी, अशी मागणी करीत आहेत.

यंदा आंबा पीक कमी आल्याने आंब्याचे भाव चांगलेच वधारले आहेत. ऐन मौसमात हापूस आंबा हा ३५० ते ४०० रुपये डझन ने विकला जात आहे. मुरूड तालुक्यात १५९० हेक्टर क्षेत्रावर हापूस आंबा पिकांची लागवड असली तरी उत्पादन क्षम क्षेत्र हे १५१० हेक्टर आहे. कोकणात बहुतांशी आंबा लागवड डोंगर उताराच्या व वरकस पडीक जमिनीवर केली जाते. थोडी आम्लयुक्त जमीन आंबा वाढीसाठी पोषक ठरते.

आगरदांडा, सावली, माझेरी, आंबोली, शीघ्रे, सावली भोईघर, बोर्ली - मांडला, साळाव, वळके, शिरगाव या परिसरातील नवनवीन आंबा बागांचे व्यवस्थापन चांगले केले जाते.

सध्या मुरूड तालुक्यात सर्व आंबा झाडावर उशिराने आलेले आंबा फळ पहावयास मिळत आहे. काही तुरळक झाडावरच आंबा दिसून आल्याने मोठ्या प्रमाणात आंबा उत्पादन घेतले आहे हे स्पष्ट दिसून येत आहे.

याबाबत स्थानिक आंबा बागायतदार सचिन पाटील यांनी सांगितले कि, बदलते हवामान आणी ढगाळ वातावरण यामुळे मुरूड तालुक्यात आंबा पिकाला खूपच कमी प्रमाणात मोहोर आला होता व कमी प्रमाणात आलेले आंब्यावरील मोहर बदलत्या वातावरणामुळे जळून गेले आहे. मुळातच आंबा पीक उशिरा आले ते सुद्धा मुबलक प्रमाणात यंदा हे पीक घेता न आल्याने आंब्याचे भाव वधारले आहेत. पावसाची चाहूल लागून अचानकपणे जोरदार वारा सुटल्याने मुरूड तालुक्यातील बहुसंख्य ठिकाणी झाडाला आलेला आंबा जमिनीवर पडल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शासनाने हि सत्य परस्थिती पहाण्यासाठी कृषी विभागाला पंचनामे करण्याचे आदेश देऊन नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.

मुरूड तालुक्यामधील यंदा ६० टक्केच आंबा पीक आले आहे. वाढते तापमान व कमी प्रमाणात थंडी यामुळे ४० टक्के घट झाली आहे. त्यातच जोरदार वाऱ्यामुळे आंबा पीक उत्पादकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



# वादळी पावसात शेतकऱ्याला हृदयविकाराचा झटका; शेतातच मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गापासून काही अंतरावर पार्ले येथील एका शेतकऱ्याचा अवकाळी पावसाच्या गडगडाट कडकडाटात हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन मृत्यू झाल्याची माहिती पोलादपूर पोलिसांनी दिली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


पोलादपूर तालुक्यातील पार्ले येथील शेतकरी श्रीधर राजाराम मोरे या ६८ वर्षीय प्रौढ व्यक्तीला हृदय विकारामुळे १९१६ मध्ये बायपास सर्जरी करण्यात आली होती. त्यामुळे धकाधकीच्या जीवनापासून दूर गावी ते एकटेच राहावयास आले होते. त्यांनी शेतीसोबत आंबा उत्पादन, कुक्कूटपालन, बकरीपालन आदी शेतीपूरक व्यवसाय वाढविले होते. आंबा बागायतीसाठी पाणी देण्याकामी त्यांनी सोलार पंपदेखील फार्महाऊसलगत बसविला होता. गेल्या १४ मे २०२४ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्यापूर्वी सोलार पॅनेलखाली त्यांचा मृतदेह आढळून आला. श्रीधर मोरे हे २-३ दिवसांपूर्वीच फार्महाऊसवर राहण्यास गेले असता त्याकालावधीमध्ये तालुक्यात अवकाळी पावसाचा गडगडाट कडकडाट झाला. यामुळे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची खबर रत्नदीप सुंदरराव मोरे यांनी पोलादपूर पोलिसांना दिली. घटनास्थळी पोलीस निरिक्षक अनिल जाधव यांनी भेट देऊन इन्क्वेस्ट पंचनामा करून पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये शवविच्छेदन करण्यात आले. याप्रकरणी पोलीस नाईक महाडीक हे पोलीस निरिक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

# रणरणत्या उन्हात शेती मशागतीच्या कामाला वेग

**खोपोली : प्रतिनिधी**

येणाऱ्या काही दिवसामध्ये पावसाला सुरूवात होणार असून, त्यासाठी पावसाळी हंगामातील पिकांच्या तयारीसाठी खालापूर तालुक्यातील शेतकर्याकडून शेतीच्या मशागतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. नांगरणी, कोळपणीसह अन्य कामांची शेतकऱ्यांकडून जय्यत तयारी सुरू आहे. गेल्या वर्षी बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला होता. त्यामुळे यंदा काय होणार याची सर्वांना आस लागली आहे.



गेल्या वर्षी पावसाने मोठ्या प्रमाणात हजेरी लावल्याने याचा मोठा परिणाम शेती व इतर व्यवसायावर मोठ्या प्रमाणात झाल्याचा दिसून आला होता. त्यामुळे काही ठिकाणी पुर परिस्थिती निर्माण झाली होती. पडलेल्या पावसामुळे शेतीसाठी बी-बियाणे, औषधे, खते, मेहनत यावर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा खर्च झाला होता. पाऊस अती पडल्याने जोमात आलेली पिकांची नासधूस झाल्याने झालेला एवढा मोठा खर्च शेतकऱ्यांचा वाया गेला, त्यामुळे बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात गेल्या वर्षी सापडला होता.

काही दिवसातच या पावसास सुरूवात होणार असून या हंगामाच्या पिकाच्या तयारीसाठी शेतांची नांगरणी खुरपणी, बांधावरील गवत पेटवणे, शेणखत शेतात पसरवणे, जमिन भुसभुशीत करणे या अशी विविध कामे सुरू आहेत. तर पावसाच्या तोंडावर शेतकर्यांच्या शेतीची मशागत करण्यामध्ये वेग वाढला आहे. गेल्या हंगामात पावसाने काही ठिकाणी मोठी हजेरी लावली होती. यंदा येणाऱ्या पावसाकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे -जिल्हाधिकारी

**रायगड : प्रतिनिधी**

शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रमाचे दुर्गराज रायगड येथे तारखेनुसार ६ जून व तिथीनुसार २० जून रोजी आयोजन करण्यात येणार आहे. मागच्या वर्षी शिवराज्याभिषेक सोहळा साडेतीनशे वर्ष पूर्ण झाल्याने येथील कार्यक्रमाला शिवप्रेमी नागरिकांची लाखोच्या संख्येने उपस्थिती होती. यंदा होणाऱ्या कार्यक्रमांची पूर्वतयारी करताना संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.





रायगड किल्ला येथे शिवराज्याभिषेक सोहळा २०२४ च्या अनुषंगाने नियोजन बैठक झाली. या वेळी जिल्हाधिकारी श्री जावळे बोलत होते बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बस्तेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एन. आर. नामदे, राष्ट्रीय महामार्ग चे कार्यकारी अभियंता दिलीप चौरे, पोलीस उपअधीक्षक एस. बी. काळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देवमाने, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी देवकाते यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जावळे म्हणाले शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिक रायगड येथे येत असतात या वर्षी होणाऱ्या सोहळा कार्यक्रमांसाठी आयोजकांकडून तयारी केली जात आहे. मागील वर्षी १५ हजार व्यक्तींची क्षमता असलेल्या गडावर अडीच लाखापेक्षा जास्त जण आल्यामुळे सुरक्षा व पायाभूत सुविधांवर मोठा ताण निर्माण झाला होता . हा अनुभव लक्षात घेऊन या वर्षी कोणतीही समस्या उद्भवू नये या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासाठी पूर्वतयारी केली जावी. येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग, पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता तसेच या कालावधीत आवश्यक असणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी सूक्ष्म नियोजन करून कार्यवाही करावी असे जिल्हाधिकारी यांनी सुचित केले.

पोलीस अधीक्षक घार्गे यांनी महाड व माणगाव मार्गे येणाऱ्या खाजगी वाहनांच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी रस्त्यांची कामे, पार्किंगच्या जागा व तेथून गडाकडे जाणाऱ्या मार्गाची व्यवस्था संबंधित विभागांनी पूर्ण करावे तसेच आवश्यक ते माहिती देणारे फलक लावले जावेत असे सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.बास्तेवाड यांनी गडावर नागरिकांच्या पाणी पुरवठ्याचे नियोजन, औषधे डॉक्टर्स व आरोग्य कर्मचारी या साठी करावयाच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन केले.

मागील वर्षी झालेला सोहळ्याबाबत केलेली कार्यवाही व यंदाच्या पूर्वतयारी बाबत विविध प्रमुख अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली. तत्पूर्वी श्री जावळे आणि उपस्थित सर्व अधिकारी यांनी रायगड किल्ल्याची पाहणी केली. तसेच आवश्यक तयारीच्या अनुषंगाने त्यांनी संबंधित यंत्रणाना निर्देश दिले.

# वृक्ष छाटणीबाबत संस्थांना आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

खाजगी भूखंडावरील झाड किंवा फांदी अंगावर पडून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने खासगी कंपन्या, संस्था, शाळा, व जागा मालक यांना नोटीस बजावल्या आहेत. उद्यान विभागाकडून शहरातील अशा धोकादायक झाडांची पाहणी करून धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणे व धोकादायक झाडे तोडणीची नियमानुसार परवानगी घ्यावी, असे नोटीसित नमूद करण्यात आले आहे.

दरवर्षी पावसाळयात नगरपरिषद प्रशासन सार्वजनिक जागा, रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या झाडांच्या धोकादायक फांद्या व धोकादायक झाडे यांची पाहणी करून आवश्यक फांद्या छाटणी करून मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार २ मे २०२४ पासून काम सुरू करण्यात आले आहे.

खासगी जागेत, औद्योगिक संस्था, शाळा महाविद्यालय, हद्दीत नगर परिषदेची पूर्वपरवानगी घेऊन अशी धोकादायक झाडे किंवा फांद्या छाटण्यात याव्या असे आवाहन मुख्याधिकारी पंकज पाटील, व उद्यान अधीक्षक निलेश लोखंडे यांनी नागरिकांना केले आहे. नागरिकांनी याबाबत सहकार्य करावे, अशी विनंती प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात नमूद करण्यात करण्यात आली आहे.

**फ्लॅट विकणे**

प्रजापती गार्डन, सेक्टर ५, न्यू पनवेल येथील २ बिएचके गार्डन फेसिंग फ्लॅट विकणे आहे. १०५० स्क्े. फू. एरिया २ बाल्कनी.

संपर्क : ९०११७५०८२४








































वर्ष ११ वे ।। ॐ बाळकृष्णाय नम:।। स्थापना २०१४



श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
**पिताजी**
**श्री. चांगू काना ठाकूर**



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
माताजी
**श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर**



श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

# अकरावा पुण्यतिथी सोहळा

आपणांस कळविण्यात येते की, आमच्या माताजी स्वानंद सुख निवासी **'श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर'** यांची अकरावी पुण्यतिथी मिती वैशाख शु. १२, शके १९४६, **सोमवार दि. २०/०५/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा.** श्री. स. स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथाचे पारायण श्री दासबोध वाचण पर्वणी प्रारंभ, मिती वैशाख शु. १३, **मंगळवार दि. २१/०५/२०२४** रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधु भगिनीनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

### सोमवार, दिनांक २०/०५/२०२४

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० – भजन** | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, पखवाज : जयराम म्हात्रे (न्हावा)<br>आत्माराम मोकल |
| **सकाळी १०.०० ते १२.०० – प्रवचन** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर,<br>ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज, चिपळूण,<br>श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), ह. भ. प. रामनाथ महाराज, वहाळ,<br>श्री. अरुणशेठ ठाकूर |
| **दुपारी ०३.०० ते ०४.०० – भजन** | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण. गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| **दुपारी ०४.०० ते ०५.०० – भजन** | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण – कोपर<br>गायीका : श्रीमती हिराबाई घरत, सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत,<br>सौ. चंद्रभागा घरत. श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ – कोपर<br>गायीका : सौ. सुप्रिया घरत, वादक: तुषार घरत |
| **सायं. ०५.०० ते ०६.०० – भजन** | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर. गायीका पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>पखवाज : श्री. पवन फडके (विहीघर) |
| **सायं. ६.०० ते ७.०० – आरती** | : माऊलींची आरती |
| **रात्री ०८.०० ते ०९.००** | दत्त प्रसादीक भजन मंडळ, खारकोपर. बुवा : वसंतशेठ पाटील<br>पखवाज : गौरव म्हात्रे |
| **रात्री ०९.०० ते ११.०० – कीर्तन** | ह. भ. प. प्रकाश महाराज पाटील कुंडेवहाळ पनवेल आणि मंडळी<br>प्रभोदनकार : विश्वनाथ वास्कर महाराज<br>मुदूंग : दीपक महाराज कुंडेवहाळ पनवेल आणि मंडळी |
| **रात्री ११ नंतर** | रात्रीचे बारा अभंग,<br>जागर (भजन– सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

### मंगळवार दिनांक २१/०५/२०२४

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० – भजन** | नादब्रम्हा भजन मंडळ, रांजणपाडा (खारघर)<br>बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी,<br>वसंतशेठ पाटील–कोपर, ज्ञानेश्वर म्हात्रे–गव्हाण, गणपत ठाकूर–कोपर, भाऊ ठाकूर, सुरेश ठाकूर – शि. नगर, नितीन ठाकूर–त. पाडा, श्री. महेश पाटील, न्हावा, पखवाज : गौरव म्हात्रे |
| **सकाळी १०.०० ते १२.००** | : श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, |
| **दुपारी १२.०० वाजता** | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

## कार्यक्रमाचे ठिकाण

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर
मु.शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

## व्यवस्थापक

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर– गव्हाण– न्हावेखाडी– कोपर (संचलित)

## संयोजक

**श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार) आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**

# अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई




**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील अनधिकृत फेरीवाल्यांवर नगर परिषदेच्या वतीने शुक्रवारी (दि. १७) धडक कारवाई करण्यात आली. या वेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे समुद्रकिनाऱ्याने मोकळा श्वास घेतला.

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर अनधिकृत फेरीवाल्यांनी ठिकठिकाणी आपली दुकानावर थाटली होती. फेरीवाल्यांसाठी ठराविक जागा नगरपरिषदेने उपलब्ध करून दिली. असतानाही फेरीवाले इतरत्र बसत होते. त्यामुळे समुद्रकिनाऱ्याला बकाल स्वरूप प्राप्त झाले होते. वारंवार सूचना करूनही फेरीवाले ऐकत नसल्याने शुक्रवारी अलिबाग नगर परिषद आणि अलिबाग पोलीस यांनी संयुक्तपणे कारवाई करीत अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा उगारला.

मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग नगर परिषदेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने ही कारवाई केली. त्यामुळे समुद्रकिनाऱ्याने मोकळा श्वास घेतला आहे.

## निवडक

### दृष्टी पाटील एमबीबीएस उत्तीर्ण



**पेण** : तालुक्यातील गडब जांभेला येथील माजी सैनिक दीपक भालचंद्र पाटील यांची मुलगी दृष्टी हिने वैशंपायन चॅरिटेबल वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर येथून एमबीबीएस ही पदवी परीक्षा उत्तीर्ण केली. या यशाबद्दल गडब रहिवासी संघ, ग्रामस्थ व पेण म्हाडा कॉलनीतर्फे दृष्टीचे अभिनंदन करण्यात आले.

### प्राचार्य विवेक ढेपे यांना पुरस्कार



**माणगाव** : तालुक्यातील उसरघर गावचे सुपुत्र तथा विवा कॉलेजचे माणगावचे प्राचार्य विवेक ढेपे यांना आविष्कार फाऊंडेशनतर्फे राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पन्हाळगड, (जि. कोल्हापूर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात झालेल्या कार्यक्रमात न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांच्या हस्ते प्राचार्य ढेपे यांना हा पुरस्कार प्रदान केला गेला. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

### गोविंद बैकर यांचा पुण्यस्मरण दिन

**माणगाव** : सामाजिक क्षेत्रात काम केलेल्या कै.गोविंद बैकर यांचा तृतीय पुण्यस्मरण दिन माणगाव तालुक्यातील बहुलेवाडी या ठिकाणी झाला. यानिमित्ताने बैकर यांच्या स्नेहीजनांचा सत्कार व गुणगौरव तसेच ग्रामस्थांना उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. या निमित्ताने आई-वडिलांची सेवा हेच पुण्यकर्म या विषयावर अजित शेडगे यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमास हेमंत बारटक्के, भागोजी पिंगळे, कमलाकर मांगले, बळीराम अप्पा चोगले पंढरी नाथ दळवी, रमेश कचरे, भिकू तात्या जाधव, यशवंत तांबट, विजय येलवे, आमिष भौड, राजू थितेकर, राजेश वारगे, कांतीलाल कसबले, रोशन फराडे, सरपंच अनिता सर्फले, ग्रामस्थ, बैकर यांचा परिवार आदी उपस्थित होते.



## रोहा कृषी अधिकारी कार्यालयात १७ पदे रिक्त

**रोहे : प्रतिनिधी**

खरीप हंगामाची तयारी शेतकऱ्यांनी सुरू केली आहे, तर दुसरीकडे कृषी विभागाच्या खरीप हंगामाच्या आढावा बैठका चालू आहेत. असे असताना शेतकऱ्यांसाठी सगळ्यात महत्त्वाचे खाते म्हणून ओळख असलेल्या कृषी अधिकारी कार्यालय अंतर्गत येत असलेल्या रोहा तालुक्यातील विविध विभागात कृषी विभागाची पदे रिक्त आहेत. २५पैकी १७ पदे रिक्त असल्याचे दिसून येत आहे.

रोहा तालुक्यात खरीप हंगामात भात, नाचणी, वरी, विविध कडधान्य, भाजीपाला आदींची लागवड अपेक्षित आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी तयारी सुरू केली आहे, तर दुसरीकडे महाबिजच्या बियाण्याचे वाटप सुरू झाले आहे, पण हा सारा कारभार ज्यांच्या सल्ल्याने शेतकरी करीत असतो व ज्यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळत असते त्या तालुका कृषी कार्यालय अंतर्गत कृषी सहाय्यक पदे रिक्त आहेत.

रोहा तालुक्यात तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंतर्गत २५ जागा मंजूर असून यापैकी आठ जागाच सध्या भरलेल्या आहेत, तर उर्वरित १७ जागा रिक्त आहेत. यामध्ये तालुका कृषी अधिकारी कार्यालयात एक कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी कोलाड अंतर्गत ११ कृषी सहाय्यक यात नागोठणे, कडसुरे, पाटणसई, ऐनघर, पुगाव, कोलाड, कुडली, हेटवणे, दुरटोली, चिल्हे, खांब; तर मंडळ कृषी अधिकारी रोहा अंतर्गत पाच कृषी सहाय्यक यामध्ये वाली, भुवनेश्वर, मेढा, सरसोली, सानेगाव आदी पदे रिक्त आहेत.

सध्या रोहा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आठच पदे भरलेली असल्याने या अधिकारीवर्गाची तालुक्याचा भार सांभाळताना दमछक होताना दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहचण्यासह विलंब होताना दिसत आहे. ते लक्षात घेता पदे लवकर भरावीत, अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे.

## राठी इंग्लिश स्कूलमध्ये सीबीएसई बारावीत अंशू माने, हर्ष तावडे प्रथम




**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या रोठ येथील जे.एम. राठी इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. सीबीएसई बारावी विज्ञान शाखेत अंशू दीपक माने ९१.२० टक्के घेऊन प्रथम आली असून वाणिज्य शाखेत हर्ष किशोर तावडे ८७.८० टक्के घेऊन प्रथम आला आहे.

बारावी विज्ञान शाखेत द्वितीय क्रमांक जीवन टॉम जाकॉब ८७.८० टक्के, तृतीय जान्हवी अनिल निपाणे ८५.८० टक्के, चतुर्थ प्रथमेश बाळासाहेब गायकवाड ८५.४० टक्के आणि पाचवा क्रमांक जान्हवी राजेश थोरे याने ८४.२० टक्के गुण मिळवून प्राप्त केला.

बारावी वाणिज्य शाखेत द्वितीय क्रमांक मनील मनोज बोराणा ७६.२० टक्के, तृतीय शृंगार राजेश मौर्या ७३.८० टक्के व गौरव सुरेश बोराणा ७३.८० टक्के, चतुर्थ शुभ निलेश गुप्ता ६७ टक्के आणि पाचवा क्रमांक अर्थव अजय तावडे याने ६०.४० टक्के गुण मिळवून प्राप्त केला.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक लीना डेव्हिड, उपमुख्याध्यापक दीपक माने यांच्यासह शाळेतील शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

## कोकण कृषी विकास प्रतिष्ठानकडून भुईमुगाचे विक्रमी उत्पादन



**पेण : प्रतिनिधी**



कोकण कृषी विकास प्रतिष्ठान खारघरने शहराच्या गजबजलेल्या ठिकाणी नव्याने भुईमूग (शेंगदाणा) या पिकाचे उत्पादन भरघोस पद्धतीने घेतले आहे. चारही बाजूने बिल्डिंग असतानासुद्धा योग्य अशी भुसभुशीत माती आणि योग्य मशागत करून प्रती एकरी सव्वीस क्विंटल शेंगदाणा पीक घेण्यात आले.

प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग व सुधारित वाणांची लागवड करून उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत व कृषीप्रेमीपर्यंत पोहचवण्याचे काम केले जाते. या प्रतिष्ठानचा प्रमुख उद्देश हा तरुणवर्गाला कृषी क्षेत्राकडे वळविण्याचा आहे. यासाठी प्रतिष्ठानने खारघर सेक्टर ५ येथे कृषी माहिती केंद्राची स्थापना केली असून त्यामार्फत मोफत कृषी वाचनालय तसेच कृषीविषयक अनेक कार्यशाळांचे आयोजनही केले जाते. आतापर्यंत होम गार्डनिंग, किचन गार्डनिंग, गांडूळ खत निर्मिती, सेंद्रीय शेती या सारख्या विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन केले. आता खारघर सेक्टर ५मध्ये अतिधन पद्धतीने आंबा, जांभूळ, कोकम, यांची लागवड केलेली असून त्यांचे उत्पादन मिळण्यास सुरुवात झाली आहे तसेच चिकु, पेरू, नारळ, केळी, सीताफळ, फणस, बोर, द्राक्षे या पिकांचीसुद्धा लागवड इथे पहावयास मिळते. विविध शाळेतील मुलांच्या सहली कृषीक्षेत्रास भेट देऊन माहिती घेत असतात. त्याशिवाय विविध सामाजिक व शैक्षणिक संघटनासुद्धा प्रतिष्ठानच्या प्रक्षेत्रात भेट देतात. कोकण कृषी विकास प्रतिष्ठानच्या सेक्टर ५मध्ये प्रतिष्ठानची फुलझाडे, वनस्पती व इतर देश विदेशातील देशातील झाडांची रोपवाटिका कार्यरत असून शेतकरी व कृषीप्रेमी त्याचा लाभ घेत आहेत.

कोकण कृषी विकास प्रतिष्ठानमध्ये शेतकऱ्यांच्या माहितीसाठी वेगवेगळ्या पिकांमध्ये प्रायोगिक प्रात्यक्षिके घेतली जातात. उन्हाळा हंगामात भाभा परमाणू संशोधन केंद्रात विकसित केलेल्या ट्रॉम्बे भुईमूग वाणांचे प्रात्यक्षिक केंद्राचे माजी शास्त्रज्ञ डॉ. एम. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले होते. मशागतीच्या सुधारित गादी वाफा व तुषार सिंचन पद्धतीचा वापर करून प्रति एकर २४ ते २६ क्विंटल उत्पन्न निघाले. त्यानंतर खरीप हंगामात कोकण कृषी विद्यापीठ कर्जत येथे विकसित केलेल्या भाताच्या वाणांची लागवड करून क्विंटल प्रती एकर उत्पन्न मिळाले. २०२३-२४ या वर्षी उन्हाळी हंगामात भुईमूग प्रचलित सुधारित वाण व मशागत पद्धतीचा उपयोग करून प्रति एकर २६ ते २८ क्विंटल विक्रमी उत्पन्न मिळवले.

यासाठी कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू भावे व भगत तसेच म्हसकर यांचे मार्गदर्शनही अधूनमधून प्राप्त होत आहे. कोकण कृषी विकास प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक शेखर सावंत, संशोधन प्रमुख श्रीकृष्ण सावंत व पर्यवेक्षक उमेश दळवी यांच्या देखरेखेखाली प्रतिष्ठानचे विविध प्रयोग चालू आहेत. या प्रात्यक्षिकामधून निरीक्षणे नोंदविण्यात आली, ती शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

## पेण येथे संयुक्त भीम जयंती महोत्सव

**पेण** : तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा संयुक्त भीम जयंती महोत्सव २० मे रोजी पेण बुद्धनगर येथील सरकारी गोडाऊनजवळ बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या वेळी उद्योजक, समाजसेवक, महिला बचत गट, यूपीएससी या परीक्षेत नुकताच उत्तीर्ण झालेला प्रशांत सुरेश भोजने या विद्यार्थ्याचा सत्कार बहुजन विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांच्या हस्ते होणार आहे.

संयुक्त भीम महोत्सवात स. १०.३० वा. बुद्ध पूजापाठ, संध्या. ६ वा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार, रात्री ८ वा. शासकीय अधिकारी, पत्रकार, उद्योजक, वकील, समाजसेवक यांचा भव्य सत्कार आणि रात्री ९ वा. गायक राहुल शिंदे पुणे आणि गायिका निशा भगत मुंबई यांचा कव्वालीचा जंगी सामना होणार आहे. या महोत्सवास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन बहुजन विद्यार्थी संघटनेचे कार्याध्यक्ष नागेश सुर्वे आणि स्वागताध्यक्ष समीर घायतळे यांनी केले आहे.

## आमदार रविशेठ पाटील, माजी मंत्री अनंत गीते यांच्याकडून संजय जांभळे यांची सांत्वनपर भेट

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अर्थ व बांधकाम सभापती संजय जांभळे यांच्या पत्नी ज्योती जांभळे यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते आणि पेणचे आमदार रविशेठ पाटील यांनी संजय जांभळे यांची वडखळ येथील निवासस्थानी सांत्वनपर भेट घेतली.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, अनिल नवगणे, तालुकाप्रमुख जगदीश ठाकूर, किशोर जैन, नरेश गावंड, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, समीर म्हात्रे, कमलाकर मोकल, शांताराम म्हात्रे, दिलीप पाटील, चंद्रहास म्हात्रे, चेतन मोकल, विजय पाटील उपस्थित होते.



## सृष्टी खोतला मास्टर्स पदवी प्राप्त

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंड्यातील आदित्य मेडिकल स्टोअर्सचे संदीप खोत यांची स्नुषा सृष्टी आदित्य खोत हिने अमेरिकेतील युनिव्ह युर्निव्हसिटीमधून इन्फॉर्मेशन सिस्टममध्ये मास्टर्स पदवी प्राप्त केली. तिच्या सुयशाचे कौतुक सर्व स्तरातून केले जात आहे.

सृष्टी खोतने लग्नानंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी सासरे संदीप खोत यांच्याकडे इच्छा व्यक्त केली. त्यानुसार संदीप खोत यांनी तिला पुढील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील बिगहॅमटोन, स्टेट युर्निव्हसिटी ऑफ न्यूयॉर्क या युनिव्ह सिटीमध्ये पाठविले. तिथे सृष्टीने सुयश प्राप्त करून इन्फॉर्मेशन



सिस्टममध्ये मास्टर्स पदवी प्राप्त केली. तिच्या कॉलेजचे डिन श्रीहरी व प्रेसिडेंट हार्वी यांच्या हस्ते पदवी दिक्षांत सोहळा ब्रिगहॅंमटोन न्यूर्याक येथे झाला. सृष्टीचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

## स्वच्छता मॉनिटरगिरीत नेणवली शाळा अव्वल

**पाली : प्रतिनिधी**

स्वच्छता मॉनिटर २०२३-२४ या दुसऱ्या टप्प्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यातील शाळा जाहीर करण्यात आल्या आहेत. राज्यातील टॉप २० शाळांमध्ये सुधागड तालुक्यातील नेणवली शाळेची निवड झाली आहे. ही शाळा रायगड जिल्ह्यात अव्वल आली आहे.



विद्यार्थ्यांनी केलेली स्वच्छता मॉनिटरगिरी, म्हणजे सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याबाबत निष्काळजीपणा करणाऱ्यांना जागीच थांबवण्याच्या घटनेचे अनेक अनुभव सोशल मीडियावर शेअर करणे, या अभियानाच्या कालावधीत राजिप नेणवली शाळेच्या विद्यार्थ्यांनी कचऱ्याबाबत होणारा निष्काळजीपणा जागीच थांबवला. त्यातील सुमारे २०० अनुभवांच्या विवरणाचे व्हिडीओ शेअर केले आणि राज्यात टॉप २०मध्ये स्थान पटकावले. त्यामध्ये राज सोनावळे, पूजा मगर, आर्या मगर, साक्षी सोनावळे, अलका वाघमारे यामध्ये सर्वाधिक राज सोनावळेने ६० अनुभव शेअर करून मोलाचे योगदान दिले. या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रोत्साहित करण्याचे तसेच त्यांच्या मनोगताचे व्हिडीओ फेसबुक, इंस्टाग्रामवर अपलोड करण्याचे भरीव काम शाळा समन्वय राजेंद्र अंबिके यांनी केले. मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी वेळोवेळी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहित केले.

या कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, केंद्रप्रमुख कल्पना पाटील, गटशिक्षणाधिकारी साधूराम बांगारे, शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी शाळेचे कौतुक केले.

**स्वच्छता मॉनिटर टप्पा-२मध्ये नेणवली शाळा महाराष्ट्रात सर्वोत्तम ठरली हे सर्व श्रेय शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी दिलेल्या स्वच्छता योगदानाचे आहे, याचा अभिमान वाटतो.**

**-राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक व स्वच्छता मॉनिटर समन्वयक**

# मा. परेश ठाकूर वाढदिवस अभीष्टचिंतन..!











































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com